जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

### मर्चंटस् बँकेचे पुढचे पाऊल – शेड्यूल्ड दर्जा



निजामशाहीत एक सर्वांगसुंदर असे शहर होते अहमदनगर. विविध बागा, ऐतिहासिक स्थळांनी त्याची किर्ती सर्वदूर म्हणजे तत्कालीन (आताच्या देशाच्या) ५–७ देशांपर्यंत होती. येथील बाजारपेठ प्रसिद्ध व गजबजलेली होती.

५०० वर्षांच्या शहराच्या इतिहासात साहजिकच बऱ्याच उलथापालथ व घडामोडी झाल्या. खरं तर हा मोठा चिंतनीय विषय आहे. इतिहास विसरलो तर भविष्यकाळ कठीण होतो म्हणतात! असो.

आज अहिल्यानगरी नामकरण झालेल्या आपल्या शहराच्या व्यापारपेठ, आर्थिक उलाढाल व भविष्याबद्दल बोलायचे म्हटल्यास अ.नगर मर्चंटस् को ऑप बँकेचा विचार व वाटा अपरिहार्य आहे.

स्वातंत्र्यानंतर हळूहळू अर्थव्यवस्था आकार घेऊ लागली. बँकींग चळवळ वाढू लागली. बँकांच्या १९७९ च्या राष्ट्रीयीकरणासह विशेषत: आपल्या महाराष्ट्रात सहकार चळवळ मूळ धरुन चांगलीच फोफावली.

नगरची बाजारपेठ मोठी होतीच विशेषत: व्यापारपेठ गजबजलेली व प्रसिद्ध होती. मराठवाड्यासह सर्वदूर आडतीचा व्यवसाय नावाजलेला होता व आहे.

या व्यापाऱ्यांना राष्ट्रीयकृत बँका पूर्ण सहकार्य करू शकत नव्हते व नेमक्या छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांच्या बँकींग सेवा सुविधांसाठी मर्चंटस् बँकेचा जन्म झाला. २४ नोव्हेंबर १९७२ रोजी प्रथम व्यवस्थापक मंडळ म्हणून विद्यमान अध्यक्ष हस्तीमलजी मुनोत, हेमराजजी बोरा, सुरजमलजी भंडारी, स्व. अशोकभाऊ फिरोदिया, डॉ. पुरुषोत्तम पाठक, बन्सीलालजी धूत, स्व. सिमरतमलजी गांधी, स्व. भंवरीलालजी मुंदडा, स्व. शांतीलालजी बोरा, वसंतराव देडगावकर यांनी कामकाज पाहिले. त्यानंतरही वेळोवेळी तत्कालीन संचालकांनी बँकेच्या नावलौकीकात भर घातली. विद्यमान अध्यक्षांचे प्रारंभापासूनचे नेतृत्त्व, ५३ वर्षांची अथक सेवा हे भारतातील एकमेव उदाहरण असेल!

आज मर्चंटस् बँकेमुळे गेल्या अर्धशतकात व्यापारपेठ उर्जितावस्थेत व टिकून आहे. यात शंकाच नाही. १९९२ च्या ग्लोबलायझेशननंतर सारे जगच बाजारपेठ बनली. त्यात खाजगी, मोठ्या बँकांची स्पर्धा तीव्र झाली. मर्चंटस् या सगळ्या आव्हानांना तोंड देत भक्कम उभी आहे. नुकत्याच मिळालेल्या शेड्यूल्ड दर्जामुळे बँकेला कार्यक्षेत्राचा विस्तार करता येवून अधिक उंच भरारी घेता येईल.

अर्थातच आजच्या डिजीटल, तांत्रिक युगात काळवेळेचे भान ठेवूनच प्रगती साधता येईल. याबाबत मर्चंटस् पूर्वीपासूनच आघाडीवर असली तरी आता ध्येय धोरणांसह प्रगतीचा वेग वाढवावा लागेल.

नुकत्याच आलेल्या रिपोर्टनुसार (NUCFDC) २०३० पर्यंत हे बँकींग क्षेत्र वार्षिक पातळीवर ११.५% दराने विकसीत होईल यात अर्बन को ऑप. बँकांकडे देशाच्या सर्वसमावेशक विकासाच्या ध्येयासाठी सुसंगत घटक म्हणून पाहिले जात आहे.

नगर जिल्हा सहकार चळवळीत अग्रेसर असून एकूण १७ सह. बँकांत जिल्ह्यात अ.नगर मर्चंटस् बँक सर्वोत्तम व अग्रगण्य कार्यरत आहे.

काही संस्थांमुळे माणसं ओळखली जातात तर काही माणसांमुळे संस्था परिचित असतात. श्री. हस्तीमलजी मुनोत व मर्चंटस् बँक यांचे समीकरणही असेच जणू! १८ जुलै त्यांचा वाढदिवस. नव्वदीतही तरुणाईच्या उत्साहाने ते बँक चालवताहेत. त्यांना मिळत असलेली संचालकांची टिमही योग्य आहे. आता या सगळ्यांनी मिळून बँकेच्या कारभारासह शहर, जिल्ह्याच्या व्यापार व्यवसाय व उद्योगधंद्यांच्या सर्वंकष विकासासाठी अधिक जोमाने झटणे अपेक्षित आहे. यातच त्यांचे व शहराची समृद्धी–सौख्य सामावले आहे.

शेड्यूल्ड दर्जा निमित्त सर्व संचालक मंडळ, कर्मचारीवृंद व सभासद–खातेदारांचे अभिनंदन आणि वाढदिवसानिमित्त श्री. हस्तीमलजी मुनोत यांचे निरामय आरोग्यासह अभिष्टचिंतन.

### लक्ष्मीबाई चव्हाण यांचे निधन




भिंगार – विजयनगर चौक, नायकुनगर येथील रहिवासी लक्ष्मी सुर्जनलाल चौहान (वय ७७) यांचे १६ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुली, २ मुले, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. अनिल सुर्जनलाल चौहान यांचया त्या मातोश्री होत तर मेहतर समाजाचे जिल्हाध्यक्ष सनी खरारे यांच्या आत्या होत.

### नवनाथ आव्हाड यांचे हृदयविकाराने निधन



नगर – मजले चिंचोली येथील रहिवासी नवनाथ शिवाजी आव्हाड (वय ४२) यांचे १६ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर मजले चिंचोली, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, भाऊ, २ मुले, वडील असा परिवार आहे.

### पोपट भोसले यांचे अल्प आजाराने निधन



नगर – आष्टी तालुक्यातील लोणी (सय्यदमीर) येथील रहिवासी पोपट किसन भोसले (वय ७७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ भाऊ, २ बहिणी, ४ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### मोहनराव गवळी यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील छत्रपती शिवाजी महाराज रोड येथील जनता सलूनचे मालक मोहनराव भिमाजी गवळी (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत गवळी, श्रीरामपूर न.प. बांधकाम अभियंता सुर्यकांत गवळी व महावितरणचे ऑपरेटर संतोष गवळी यांचे वडील, सुरभी सलूनचे मालक संजय गवळी व गोकुळ गवळी यांचे चुलते होत.

# शहरात येणाऱ्या अवजड वाहनांवर तातडीने कारवाई करावी

**उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी**

नगर – प्रवेश बंदी असतानाही शहरात येणाऱ्या अवजड वाहनांमुळे वारंवार अपघात होत असून या वाहनांवर कारवाई करण्याची मागणी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात म्हंटले आहे की, शेंडी बायपास येथे अवजड वाहने मोठ्या प्रमाणात ये–जा करत असतात व ते शहरामध्ये देखील येतात, या वाहनांना कोणाचा आशीर्वाद आहे. यामुळे अनेक अपघाताच्या घटना होत असून शेंडी बायपास येथे मतीन सय्यद यांच्या वाहनाला अवजड वाहन येऊन धडकले. त्यांनी गाडी ताबडतोब रस्त्याच्या खाली घेतल्यामुळे ते वाचले, मात्र अवजड वाहने ओव्हरलोड असल्यामुळे त्यांचे ब्रेक लागत नाही व रोज कोठे ना कोठे भीषण अपघात होत आहे. १६ जुलैला दिल्लीगेट येथे झालेल्या भीषण अपघातात युवकाला ढंपरने चिरडले.

या घटनेमुळे शहरात रस्त्यावर पायी चालणारे युवक युवती नागरिक देखील सुरक्षित नाही. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे फ्लाईंग स्कॉड फक्त वसुली करताना दिसत आहे. यामुळे या घडलेल्या अपघाताला जबाबदार धरून भरारी पथकातील अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी व त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी मतीन सय्यद, कैलास पगारे, कैलास सोनवणे, संजय हातरुणकर, नईम शेख, आसिफ शेख, जावेद सय्यद, समीर शेख, असलम शेख, तनवीर शेख, आयाज शेख, आसिफ सय्यद, वसीम शेख उपस्थित होते.



शहरात येणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाई करावी या मागणीचे निवेदन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना देताना मतीन सय्यद, कैलास पगारे, कैलास सोनवणे, संजय हातरुणकर, नईम शेख, आसिफ शेख, जावेद सय्यद, समीर शेख, असलम शेख, तनवीर शेख, आयाज शेख, आसिफ सय्यद, वसीम शेख आदी.



अवजड वाहनांमुळे अपघात होवून मयत झालेल्यांच्या कुटुंबियांना २५ लाखांची नुकसान भरपाई देण्याची मागणी समाजवादी पार्टीच्या वतीने निवेदनाद्वारे करताना शहरजिल्हा अध्यक्ष आबिद हुसेन व पदाधिकारी.

## शहरात बंदी असताना अवजड वाहने कोणाच्या आशिर्वादामुळे येतात ?

**समाजवादी पार्टीचा सवाल, मयताच्या कुटुंबियांना २५ लाख रुपये नुकसान भरपाई द्या**

नगर – शहरात प्रवेश बंदी असतानाही अवजड वाहने कोणाच्या आशिर्वादा मुळे येतात ? असा सवाल करत अवजड वाहनांमुळे बळी गेलेल्यांच्या कुटुंबियांना राज्य सरकारच्या वतीने प्रत्येकी २५ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी समाजवादी पार्टीच्या वतीने करण्यात अली आहे.

या संदर्भात शहरजिल्हा अध्यक्ष आबिद हुसेन यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन दिले आहे. यामध्ये म्हंटले आहे की, नगर शहरातील वाहतूक समस्या आज पर्यंत सुटलीच नाही, पूर्वी उड्डाणपूल व बाह्य वळण रस्ता नसल्या मुळे दररोज अपघात होतं होते. त्यात कित्येक बळी गेले, परंतु अता शहरात उडाणपूल तसेच बाह्य वळण रस्ता असून ही बिनधास्तपणे अवजड वाहतूक सुरु आहे. त्यामुळे अपघात होवून निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. आठ दिवसा पूर्वीच तारकपूर येथे एका महिलेचा दुर्दैवी अंत झाला. परंतु निर्लज्ज, बेशरम, बेजबाबदार अधिकाऱ्यांनी याची कोणतीच दखल घेतली नाही. व १६ जुलै रोजी दिल्लीगेट येथे पुन्हा प्रशासनाच्या हलगर्जी पणामुळे एक निष्पाप तरुणाचा दुर्दैवी बळी गेला. याला पोलीस अधीक्षक, ट्रॅफिक पोलीस व महापालिकेचे अधिकारीच जबाबदार असून त्या सर्वांचे समाजवादी पार्टीच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

या अपघातात बळी गेलेल्यांच्या कुटुंबियांना राज्य शासनाने २५ लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून द्यावी. व अजून कोणाच्या बळीची वाट न पाहता त्वरित शहरातून जड वाहतूकीला बंदी घालावी. अन्यथा नगरकरांच्या सुरक्षतेसाठी समाजवादी पार्टी मोठे जन आंदोलन उभारेल याची प्रशासनाने गंभीर नोंद घ्यावी. असा इशारा या निवेदनात शहरजिल्हा अध्यक्ष आबिद हुसैन यांनी दिला आहे.

## ‘हत्ती बारव’ बाबतचा निर्णय स्वागतार्ह पण इतर ऐतिहासिक वास्तूंकडे प्रशासन व पुरातत्व विभागाची डोळे झाक का?

नगर – नगर जामखेड रोड वरील ऐतिहासिक हत्ती बारवला राष्ट्रीय संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सुरु केलेले प्रयत्न निश्चितच स्वागतार्ह आहेत, परंतु नगर शहरात व परिसरात इतर अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत, त्यांच्या कडे जिल्हा प्रशासनाची व पुरातत्व विभागाची डोळे झाक का? असा सवाल समाजवादी पार्टीच्या वतीने उपस्थित करण्यात आला आहे.

याबाबत समाजवादी पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन दिले आहे. यामध्ये म्हंटले आहे की, जामखेड रोड वरील ‘हत्ती बाराव’ला राष्ट्रीय संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळवून देण्यासाठी सध्या जिल्हाधिकारी व पुरातत्व विभाग तर्फे प्रयत्न चालू असून देशाचे ऐतिहासिक महत्व येणाऱ्या पिडीला माहित होण्यासाठी ते अत्यंत गरजेचे आहे. सदर निर्णय नक्कीच स्वागतार्ह आहे. परंतु शहरातील इतर ऐतिहासिक वास्तूंकडे पुरातत्व विभागाचे तसेच जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूंची सध्या प्रचंड दुरावस्था झालेली आहे. शहराच्या संस्थापकाच्या मजारला दर्शनाला जाण्यासाठी रस्ताच नाही, आंदोलन केले तर सद्या फंड उपलब्ध नाही असे उत्तर दिले जात आहे. तरी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शहरातील इतर ऐतिहासिक वास्तूंच्या झालेल्या दुरावस्थेकडे गांभीर्याने लक्ष देवून या वास्तूंची देखभाल दुरुस्ती करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला द्यावेत, अशी मागणी समाजवादी पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन यांनी केली आहे.

## ‘क्रिप्टो करन्सी’च्या माध्यमातून ॲपद्वारे नगरमधील चौघांची ९७ लाखांची फसवणूक

*(पान १ वरुन)*

शिवअंबिका या महिला अधिकारी यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. यावरुन फिर्यादी यांची खात्री झाली की, ही सर्व फसवणूक पूर्वनियोजित असून, शिवअंबिकासह काही लोकांनी क्रिप्टो ट्रेडिंगच्या आडून विश्वासघात केला आहे.

या प्रकरणी गौरव महाजन यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन एंजल एक्स व एंजल एक्स सुपर ॲपच्या शिवअंबिका (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही) यांच्या विरुद्ध बी एन एस कलम ३१६ (२) प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सपकाळे हे करीत आहेत.

### पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर – भरधाव वेगातील महिंद्रा पिकअपने समोरुन येणाऱ्या मोटारसायकलला धडक दिली. या धडकेत मोटारसायकल वरील एकाचा मृत्यू झाला. तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. ही घटना नगर जामखेड रोडवर टाकळी काझी (ता.नगर) गावच्या शिवारात हॉटेल साईराम ॲण्ड रेस्टॉरंट समोर १३ जुलै रोजी दुपारी साडेतीन वाजल्याच्या सुमारास घडली.

याबाबत भाऊसाहेब गणेश भारती (वय २८, रा.दासखेड ता. पाटोदा जि. बीड हल्ली रा. करेवाडी ता. आष्टी, जि. बीड ) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा भाऊ अविनाश गणेश भारती असे दोघेजण त्यांची हिरो कंपनीची सीडी डीलक्स मोटारसायकल (क्र. एम एच २३ बी डी १५५६) ने टाकळी काझी गावच्या शिवारातून हायवे वरील हॉटेल साईराम अँड रेस्टॉरंट समोरुन जात असताना समोरून भरधाव वेगात आलेल्या महिंद्रा कंपनीच्या पिकअप गाडीने (क्रमांक एम एच २५ ए आय ६७९७) मोटारसायकलवर धडक दिली. या अपघातात अविनाश भारती याचा मृत्यू झाला तर फिर्यादी हे गंभीर जखमी झाले. अपघात होताच टेम्पो चालक घटनास्थळावरून टेम्पो सह पसार झाला. घटनास्थळा वरील नागरिकांनी अपघातग्रस्तांना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात भाऊसाहेब भारती यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन टेम्पो चालक यासीन मुसा शेख (रा. पुरंदर सोसायटी, हडपसर, पुणे) याच्याविरुद्ध बी एन एस कलम १०६ (१), २८१, १२५(अ) ३२४ (४) मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४(अ) (ब) प्रमाणे अपघाताचा गुन्हा दाखल केला पुढील तपास पोलीस उप निरीक्षक एकनाथ आव्हाड हे करीत आहेत.

### बबनराव उपकारे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – तोफखाना, परदेशी गल्ली येथील रहिवाशी बबनराव बाबुराव उपकारे (वय ६५) यांचे १६ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी, तीन मुले, सुना, नातू असा परिवार आहे. विशाल, वैभव, महेश उपकारे यांचे ते वडिल होत.

### अशोक मुथा यांचे हृदयविकाराने निधन



नगर – पुणे येथील धनकवडी येथील रहिवासी अशोक लालचंद मुथा (वय ७६) यांचे १७ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिरुर मर्चंट बँकेतील कॅशियर सतिश मुथा यांचे ते वडील होत. श्रीगोंदा येथील मुथा परिवाराचे ते काकाजी होते.

### कलावतीबाई कौठुळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – खडकी येथील रहिवासी कलावतीबाई राजाराम कौठुळे (वय ८५) यांचे १६ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्याव खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. शिवाजी, संभाजी कौठुळे यांच्या त्या मातोश्री होत.

## ‘सह्याद्री मल्टीसिटी निधी’मध्ये अडकलेल्या ठेवी मिळवून द्याव्यात

**ठेवीदारांची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी**

नगर – नगर मधील सह्याद्री मल्टीसिटी निधी लि. या संस्थेत अनेक ठेवीदारांच्या ठेवी अडकलेल्या असून सदरील संस्थेचे चेअरमन व संचालक मंडळाच्या मालमत्तांचे लिलाव करुन ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळवून द्याव्यात अशी मागणी ठेवीदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत पत्रकार परिषदेत माहिती देताना ठेवीदार असलेले माजी प्राचार्य श्रीधर दरेकर यांनी सांगितले की, अनेक ठेवीदारांनी सह्याद्री मल्टीसिटीमध्ये मुलांच्या शिक्षणाकरिता, मुलींच्या विवाहाकरीता तसेच इतर कारणांसाठी ठेवी ठेवलेल्या होत्या. या ठेवींची मुदत संपल्यानंतर संस्थेचे चेअरमन संदीप थोरात याच्यासह इतर संचालक व व्यवस्थापक यांनी ठेवी देण्यास टाळाटाळ केली. या सर्वांनी ठेवीदारांच्या ठेवीच्या रकमा परस्पर काढून घेत त्यातून त्यांच्या स्वत:च्या तसेच इतर नातेवाईकांच्या नावे मिळकती घेतलेल्या आहेत.

तसेच ठेवीदारांच्या पैशांतून मौज–मजा केली आहे. ठेवीच्या रकमा परत न देता अनेक ठेवीदारांची फसवणूक केली आहे. त्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करुन त्यांच्या मालमत्तांचा लिलाव करुन गोरगरीब सर्वसामान्य ठेवीदारांना त्यांच्या ठेवीच्या रकमा परत मिळवून द्याव्यात अशी मागणी ठेवीदारांनी मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे प्राचार्य दरेकर यांनी सांगितले.

## शिक्षक बदलीतील प्रमाणपत्रांची त्रयस्थ समितीद्वारे चौकशी करा

**जिल्हा रुग्णालय व त्या संबधित विभागांना तपासणीचे अधिकार देऊ नये अन्यथा उपोषणाचा इशारा**

नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक बदली प्रक्रियेत दिलेले दिव्यांग, घटस्फोटीत, परित्यक्ता, मतिमंद व गंभीर आजार प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणी जिल्हा रुग्णालय व त्या संबधित विभागांना न देता, त्रयस्थ समितीची नेमणूक नाशिक जिल्हा रुग्णालय येथून करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले असून, याबाबत तातडीने कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद समोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षक बदली प्रक्रियेमध्ये प्राथमिक शिक्षकांनी स्वतःच्या हितासाठी सन २०२१ मध्ये बनावट कर्णबधिर, मतिमंद बनावट प्रमाणपत्र दिलेले असून, हे प्रमाणपत्र देणारे जिल्हा रुग्णालय मध्ये रॅकेट होते. जिल्हा परिषदेने त्याच जिल्हा रुग्णालयाकडे तपासणी देऊ नये, ते प्रमाणपत्र तपासणीसाठी त्रयस्थ समिती नेमून नाशिक जिल्हा रुग्णालय किंवा आर्मी रुग्णालय पुणे यांच्याकडून तपासणी करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यापूर्वी सन २०२२ मध्ये बदली प्रक्रियेत प्रमाणपत्राची तपासणी ससून रुग्णालय पुणे यांच्याकडून करण्यात येणार होती. त्याबाबत शिक्षकांनी स्वतःच्या बचावासाठी कोर्टात धाव घेतली. त्यानंतर त्या प्रमाणपत्र तपासणी अहवाल प्रलंबित आहे. काही महिला शिक्षकांनी घटस्फोटीत व परितक्त्या असल्याचे दाखवून शिक्षण विभागाची दिशाभूल केली आहे. त्यावर सर्व कागदपत्र तपासणी स्थळी पाहणी करण्यात यावी. घटस्फोट झाला तर त्याचा कोर्ट निकाल तपासण्यात यावा. त्रयस्थ समिती अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत न नेमता दुसऱ्या विभागातून नेमून त्याची तपासणी करण्याचे निवेदनात म्हंटले आहे.

काही प्राथमिक शिक्षकांनी संवर्ग बदली प्रक्रियेसाठी दिशाभूल करणारी प्रमाणपत्र दिलेली आहे. ते देखील त्रयस्थ समितीकडून तपासण्यात यावी. इतक्या मोठ्या प्रमाणात संवर्ग एक मध्ये दुर्धर आजार, पक्षाघात, कर्करोग, मेंदूचे विकार, थॅलेसमिया व दिव्यांग असलेले शिक्षक म्हणजे विशेष आहे. अशा बनावट प्रमाणपत्र देऊन शासनाची दिशाभूल करून खऱ्या लाभार्थ्यांवर अन्याय केला जात आहे. जिल्ह्यातील सर्व शिक्षक बदली प्रक्रियेमध्ये ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई १५ जून २०२५ चे शासन परिपत्रक स वर्गची पायमल्ली मोठ्या प्रमाणात केली गेली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासाठी अहिल्यानगर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक बदली प्रक्रियेत दिलेले दिव्यांग, घटस्फोटीत, परित्यक्ता, मतिमंद व गंभीर आजार प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणी जिल्हा रुग्णालय व त्या संबधित विभागांना न देता, त्रयस्थ समितीची नेमणूक नाशिक जिल्हा रुग्णालय येथून करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

## बायपास पुलाजवळ संशयितरित्या फिरणाऱ्या एकास अटक

नगर – रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन तोंडाला रुमाल बांधून संशयितरित्या फिरणाऱ्या तरुणास नगर तालुका पोलीसांनी पकडले. ही कारवाई नगर जामखेड रोडवरील सारोळा बद्धी शिवारातील बायपास पुलाजवळ १६ जुलै रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

नगर तालुका पोलीस जामखेड रोडवर रात्री गस्त करीत असताना सारोळा बद्धी शिवारात बायपास पुलाजवळ एक तरुण तोंडाला रुमाल बांधून, अंधाराचा फायदा घेत, संशयितरित्या वावरताना मिळून आला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्याचे नाव किरण काशिनाथ रोकडे (वय २५, रा. कासोद, ता. सिल्लोड, जि. संभाजीनगर) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यास इतक्या रात्री इकडे काय करतोस असे विचारले असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाही. यावरुन पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.

याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात पोकॉ. विजय साठे यांनी दिलेल्या फर्यादीवरुन किरण रोकडे याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली. तपास सहाय्यक फौजदार सय्यद हे करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज करा वेलचीचे सेवन

भारतीय स्वयंपाकघरातील मसाले शतकानुशतके अन्नाला स्वादिष्ट बनवण्यास तसेच आरोग्य सुधारण्यात विशेष भूमिका बजावत आहे. तसेच हिरवी वेलची गोड पदार्थ, चहा किंवा बिर्याणीची चव वाढवण्यात मुख्य भूमिका बजावते. आज आपण जाणून घेऊ या हिरवी वेलचीचे फायदे. वेलचीमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे त्वचेतील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात. वेलचीमध्ये पोटॅशियम भरपूर असते, जे शरीरातील सोडियमची पातळी संतुलित करण्यास मदत करते. जर तुम्हाला तोंडाची दुर्गंधीची समस्या असेल तर तुम्ही हिरवी वेलची खाऊ शकता. जी नैसर्गिक तोंडाला फ्रेशनर म्हणून काम करते. हिरव्या वेलचीमध्ये फायबर तेल असते, जे तुमचे पचन निरोगी ठेवण्यास मदत करते. ७ दिवस ते खाल्ल्याने गॅस, अपचन आणि आम्लतेची समस्या दूर होते. वेलची हृदयाच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर मानली जाते. ते कोलेस्टेरॉल संतुलित करण्यास मदत करते आणि रक्ताभिसरण सुधारते.

## पाककला

### अंजीर खीर

**साहित्य :** पाच अंजीर, एक कप मखाना, एक कप राजगिरा, अर्धा कप सुकामेवा, वेलची कुस्करलेली, अर्धा कप साखर, ४ कप दूध

**कृती :** सर्वात आधी अंजीर कोमट पाण्यात अर्धा तास भिजत ठेवा. भिजल्यानंतर ते मिक्सर जारमध्ये ठेवा आणि पेस्ट बनवा. आता एका पॅनमध्ये दूध गरम करा. नंतर त्यात मखाना आणि राजगिरा घाला, आता अंजीर कुस्करून मिक्स करा. त्यानंतर सुकामेवा आणि वेलची पावडर घाला. आता ते थोडे उकळू द्या आणि नंतर साखर किंवा गूळ घाला आणि गॅस बंद करा. आता तयार खीर एका बाऊलमध्ये काढा. स्वादिष्ट अंजीर खीर तयार आहे.

## वास्तू

* जर रस्त्यावर लिंबू किंवा मिरच्या पडल्या असतील तर वडीलधाऱ्यांनी त्यांना ओलांडू नये असा सल्ला दिला आहे. काही लोक नकारात्मक ऊर्जा दूर करण्यासाठी त्यांचा वापर करतात. पण जर कोणी त्यांचे उल्लंघन केले तर त्या शक्ती त्यांच्या मागे येण्याची शक्यता आहे. म्हणून, जेव्हा अशा गोष्टी दिसतात तेव्हा तुम्ही बाजूला जाणे चांगले. जरी ही सवय एक छोटीशी खबरदारी असली तरी, ती आपल्याला अनावश्यक समस्या टाळण्यास मदत करू शकते.

* रस्त्यावर केसांचा एक गुच्छ पडलेला दिसल्यास त्याजवळून जाऊ नये. असे मानले जाते की ते शुभ नाही आणि राहूच्या शक्तीचे प्रतिनिधित्व करते. काही लोक तंत्र साधनेत त्यांचा वापर करतात. जेव्हा आपण हे केस ओलांडतो तेव्हा आपल्या जीवनावर वाईट परिणाम होण्याची शक्यता असते. म्हणून आधीच सावधगिरी बाळगणे चांगले.

## सल्ला

* काजू व इतर ड्रायफुट मध्ये किड लागू नये म्हणून डब्यात दोन-तीन लवंग टाका.

* कारल्याची भाजी करताना कारल्याची भाजी करताना त्याचा कडूपणा घालविण्यासाठी चिरलेल्या कारल्याच्या चकत्या काही वेळपर्यंत ताकात बुडवून ठेवाव्यात.

## सौंदर्य

कॉफी पावडरऐवजी ग्राउंड कॉफी वापरणे जास्त योग्य ठरते. अर्धा कप कॉफीत ३ चमचे बॉडी ऑइल आणि २ चमचे गुलाब पाणी मिसळा. जास्त कोरडे मिश्रण झाल्यास गुलाबपाणी वाढवा. हे स्क्रब थाइज वा हिप्ससारख्या सेल्युलाइड अफेक्टेड त्वचेवर लावा. आठवड्यातून ३ वेळा याचा वापर केल्यास चांगले परिणाम दिसून येतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५

**---, करिदिन, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, अश्विनी २६।१४, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४०मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आपणास प्रोत्साहित करणारे घटक जाणून घ्या. भीती, चिंता, शंका, राग, लोभ असे नकारात्मक दृष्टीकोन तुम्हाला सोडावे लागतील.

**वृषभ :** तुमचे जीवन बदलण्यासाठी पत्नी मदत करील. स्वतःच्या प्रयत्नाने तुम्ही तुमचे जीवन फॅशनेबल करू शकाल.

**मिथुन :** आज पत्नीसुख मिळेल. उतावीळपणे कोणताही निर्णय घेऊ नका, अन्यथा त्यामुळे आयुष्यात नंतर पश्चाताप करावा लागेल.

**कर्क :** दुसऱ्यांवर प्रभाव पडावा म्हणून मर्यादेच्या बाहेर खर्च करू नका. दुसऱ्यांना मदत करण्याची तुमची ताकद, सकारात्मक विचारांनी सुधारा.

**सिंह :** आजच्या दिवशी आपल्या खर्चावर नियंत्रण मिळवाल, चैनीसाठी पैशांची उधळपट्टी होणार आहे.

**कन्या :** तुम्ही तुमच्या प्रिय पत्नीशी पूर्वी झालेल्या मतभेदाबद्दल तिला माफ कराल. गैरसमज दूर होतील.

**तूळ :** मित्र तुमच्या खुल्या मनाची आणि सहनशक्तीची परीक्षा पाहतील. आर्थिक व्यवहारांमध्ये गुंतले जाणार नाही याची काळजी घ्या.

**वृश्चिक :** पुरेशी विश्रांती घ्याल. मागील उधारी वसुल होईल. जुने मित्र व नातेवाईक यांच्यासमवेत दिवस आनंदात जाईल. वाहने व उपकरणे खराब होतील.

**धनु :** हितशत्रू डोके वर काढतील. कामात उतावीळपणा केल्यास मनशांती गमावून बसाल.


**मकर :** आरोग्य विषयक असलेल्या जुन्या समस्या जातील मात्र आर्थिक प्रश्न आ वासून उभे राहतील.

**कुंभ :** व्यावसायिक नुकसान होईल. भाऊबंद वडीलोपार्जित मालमत्तेवरून कटकटी करतील.

**मीन :** अतिखर्च, उधळेपणा आणि शंकास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंताल. मातृचिंता सतावेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. ११९७ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) + +++++ ++ जवाब नही (गाणे) ५) ++ तेरी गंगा मैली (चित्रपटाचे नाव) ६) 'जंजीर, मुकद्दर का सिकंदर, शराबी' आदी चित्रपटांचे दिग्दर्शक ९) ++ कपूर एक दिवंगत अभिनेता तथा शोमन) १०) एक +++ हो सपनों का (चित्रपटाचे नाव) ११) 'आशीर्वाद' या अर्थाचा शब्द १२) +++++ भारत होवो विश्वात शोभूनी राहो (एक मराठी गाणे) १३) ++ घटा (चित्रपटाचे नाव) १५) +++ झनक पायल बाजे (चित्रपटाचे नाव) १६) + और मेरा हाथी (चित्रपटाचे नाव) १७) जॉनी मेरा ++ (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) एक दिवंगत चरित्र अभिनेता २) सध्याचा एक विनोदी अभिनेता ३) ++ क्या होगा कालिया ('शोले'मधील गब्बरसिंगच्या तोंडचा संवाद) ४) अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, रेखा, झीनत अमान, अजित, निरुपा रॉय यांचा एक चित्रपट ७) अमिताभ बच्चन, अजय देवगण, सोनाली बेंद्रे, नवीन निश्चल, नफिसा अली, आशिष विद्यार्थी आदींचा एक चित्रपट ८) ++++ + लक्ष्मण (चित्रपटाचे नाव) १२) दो +++ (चित्रपटाचे नाव) १४) ++ चंदावरकर (जुन्या काळातील एक अभिनेत्री)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जे बदलणं शक्य आहे ते बदला. जे बदलता येत नाही ते स्वीकारा आणि जे स्वीकारता येत नाही, त्याच्यापासून दूर राहा. पण स्वतःला आनंदी ठेवा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मधुमेहाचे रुग्ण केळी खाऊ शकतात का?

मधुमेहाच्या रुग्णांसाठी केळी हे असे एक फळ आहे ज्याबद्दल अनेकदा प्रश्न उपस्थित होतात. मधुमेहात केळी खाणे सुरक्षित आहे का? जर हो, तर केळी कधी आणि किती प्रमाणात खावीत जेणेकरून ते त्यांच्या आरोग्याला हानी पोहोचवू नये? ही माहिती खूप महत्वाची आहे.

केळी हे फायबरचा चांगला स्रोत आहे, जे रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करते. केळीमध्ये पोटॅशियम भरपूर असते, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. केळी देखील व्हिटॅमिन सीचा एक चांगला स्रोत आहे, जो रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. केळीमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे पेशींना नुकसान होण्यापासून वाचवतात.

पिकलेल्या केळ्यांमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असतो, ज्यामुळे रक्तातील साखर लवकर वाढू शकते. केळीमध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असते, जे रक्तातील साखरेवर परिणाम करू शकते.

कच्च्या केळ्याचा जीआय पिकलेल्या केळ्यापेक्षा कमी असतो, त्यामुळे मधुमेही रुग्णांसाठी हा एक चांगला पर्याय आहे. मधुमेहाच्या रुग्णांनी कमी प्रमाणात केळी खावी. दिवसातून अर्धा किंवा एक लहान केळ पुरेसे आहे. सकाळी किंवा दुपारी केळी खाणे चांगले. रात्री केळी खाणे टाळा. केळी इतर फायबरयुक्त पदार्थांसारख्या काजू किंवा बियांसोबत खाल्ल्याने रक्तातील साखर नियंत्रित होण्यास मदत होते.

जर तुमच्या रक्तातील साखरेची पातळी खूप जास्त असेल तर केळी खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

कमी जीआय, मधुमेहासाठी चांगले. मध्यम, कमी प्रमाणात खाल्ले जाऊ शकते. उच्च जीआय, मधुमेहींसाठी योग्य नाही. मधुमेही रुग्ण केळी खाऊ शकतात, पण कमी प्रमाणात आणि योग्य पद्धतीने. पिकलेल्या केळ्यापेक्षा कच्चे केळे हा एक चांगला पर्याय आहे. जर तुमच्या रक्तातील साखरेची पातळी खूप जास्त असेल तर केळी खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## शंबरासूर वध

शंबरासुर नावाचा एक राक्षसांचा राजा होता. असुरांमध्ये जरी त्याला मान होता तरी तो क्रूरकर्मा होता. श्रीकृष्ण व रुक्मिणीचा पुत्र प्रद्युम्न हा आपला वध करणार आहे, असे त्याला समजले. म्हणून प्रद्युम्नाचा जन्म झाल्यावर सहाव्या दिवशी त्याने त्याला पळवून नेऊन समुद्रात फेकले. तेथे एका मोठ्या माशाने त्याला गिळले. काही दिवसांनी एका मासेमाराने त्या माशाला पकडले. तो नेमका शंबरासुराची स्वयंपाकगृहाची व्यवस्था पाहणाऱ्या मायावती या स्त्रीकडे गेला. ही मायावती पूर्वजन्मी कामदेवाची पत्नी होती. कामदेव भस्म झाल्यावर त्याच्या पुनर्जन्माची प्रतीक्षा करताना तिने शंबरासुरास मोहित केले व ती त्याच्या अंतःपुरात राहू लागली.

मायावतीने तो मासा चिरताच त्यातून एक सुंदर बालक बाहेर आले. मायावतीस नारदाने सांगितले, हा भगवंतांचा पुत्र असून तू त्याचे पालनपोषण कर. तिने त्याचे संगोपन केले. तो तरुण झाल्यावर मायावतीस त्याच्याबद्दल आकर्षण वाटू लागले. आपल्या आईचे हे आपल्यावर आसक्त होणे प्रद्युम्नाच्या लक्षात येताच त्याने आश्चर्य प्रकट केले. यावर मायावतीने त्याला खरे काय ते सांगितले. प्रद्युम्न ते ऐकताच शंबरासुरावर चालून गेला. मायावतीने शिकवलेल्या मायावी विद्येने त्याने शंबरासुर व त्याच्या सैन्याला मारून टाकले. मायावतीबरोबर तो विमानाने आपल्या पित्याच्या नगरीत आला.

रुक्मिणीला त्याला पाहताच वात्सल्यभाव दाटून आला व तिला आपल्या हरण झालेल्या मुलाची आठवण येऊ लागली. तो आपला व श्रीकृष्णाचा पुत्र असावा, असेच तिला वाटू लागले. याच वेळी नारदमुनी श्रीकृष्णासह तेथे आले. त्यांनी रुक्मिणीला हा तिचाच मुलगा असून, शंबरासुराचा वध करून तो आल्याचे सांगितले. तसेच हा प्रत्यक्ष कामदेव अर्थात मदन असून, मायावती म्हणजेच त्याची पूर्वजन्माची प्रिया रती आहे, असेही सांगितले. हे सर्व ऐकून कृष्ण व रुक्मिणीसह सर्व द्वारकानगरी आनंदित झाली.



## जीवन का अमृत (भाग १)

समय देने में सफल हुए हैं और आप इसे बढ़ाने की सोच रहे हैं। मन को काबू में करने के लिए, भजन-सिमरन सबसे अच्छी दवा है। ब्रह्म मुहूर्त का समय भजन सिमरन के लिए सर्वोत्तम है, क्योंकि सारे विचार रात के आराम के बाद खत्म हो जाते हैं और खाना हज़म हो चुका होता है। आप जो झिंगुर जैसी आवाज सुनते हैं, वह निम्न किस्म की आवाज है। जब आप एकाग्रता के साथ सुनेंगे, तो आपको और ऊँची और मधुर, ऊपर उठाने वाली आवाजें सुनाई देंगी।

आप बताते हो कि आपका एक ही लक्ष्य है कि आप अंतर में दिखने वाली ज्योति के पार चले जाएँ। ज्योति के पार जाने का सही तरीका यह है कि ज्योति या जो कुछ भी दिखाई दे, उसके बीच में एकटक देखते जाओ। रोशनी पार जाने के लिए अपनी कोशिशों पर निर्भर मत रहो, बल्कि गुरु-शक्ति में श्रद्धा रखो कि वह तुम्हें रास्ता दे। इस प्रकार आपका मन भी काबू में रहेगा। मन तभी भागता है, जब आपकी आंतरिक नज़र अस्थिर हो जाती है। जैसे-जैसे आत्मा आध्यात्मिक रास्ते पर चलती हैं, देखने की क्षमता सुनने की क्षमता से आगे चलती हैं, यानि ज्योति श्रुति से तेज होती है।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

भजन-सिमरन के एकदम बाद आरामदेह अवस्था में लेटने पर कुंडलिनी शक्ति का जागृत होना, हो सकता है, इसलिए हो कि आपका ध्यान अपनी साँसों की ओर चला जाता हो। आप मानेंगे कि भजन- सिमरन के समय अगर ध्यान साँसों की ओर या रूह के सिमटने की ओर जाता है,

इस तरह की परेशानियाँ आ सकती हैं। इसलिए भजन-सिमरन के दौरान हमारा ध्यान पूर्ण रूप से दिव्य-चक्षु पर टिका रहना चाहिए और हमें अपने शरीर, अपनी साँसों, दिल की धड़कन इत्यादि की कोई खबर नहीं होनी चाहिए। हमारी एकाग्रता भंग होने की वजह से ही ऐसा होता है और प्रेमपूर्वक दिव्य चक्षु पर ध्यान टिकाने से इन परेशानियों से बचा जा सकता है।

भजन-सिमरन का अभ्यास सरल, प्राकृतिक और आनंददायी होना चाहिए, जिसमें आप कई-कई घंटे बैठ सकें। अतः कृपया इस प्रकार अनुभवों से, जो आपके विश्वास को झकझोर दें और आपको रास्ते से दूर ले जाएँ, बचें, जब तक कि आप काफी उन्नति न कर चुके हों और अंदर से इतने मजबूत ना गए हों कि इस प्रकार के बुरे अनुभवों का आप पर कोई असर न हो और आप अपने प्रेम से भरे विचार दूसरों तक फैला सकें।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

इस से जो भोजन खाने के बाद नींद आती है वह नहीं आएगी। अमृतवेले भी नींद नहीं सताएगी। हर काम में चुस्ती बनी रहेगी।

आज्ञा चक्र -३४-

मन भोजन का प्रभाव

क्रांतिकारी और समाज परिवर्तकों और आध्यात्मिक क्रांति लाने वालो का स्वस्थ होना अति आवश्यक है। लेकिन सफलता को आतुर लोग हमेशा अपने स्वास्थ्य की बलि चढ़ा देते हैं। बड़े बड़े गुरु, पीर पैगम्बर, देश भक्त, विज्ञानिक, शिक्षाविद, समाज सुधारक और परिवार सुधारक लोग अति व्यस्त हो जाते हैं। इस व्यस्तता के कारण वे सेहत गंवा बैठते हैं और उनका देह साथ छोड़ देती है। आज के युग में मनुष्य जाति बूढ़ा, बच्चा, जवान, योगी और आम आदमी सामने कोई न कोई चुनौती है। जिसके कारण मानसिक रुप से बहुत गहरे स्तर पर असंतुष्ट है, निराश हैं। इसी लिये रोग बढ़ रहे हैं।

### आज्ञा चक्र

आज प्रत्येक व्यक्ति अवसाद की ओर बढ़ रहा है। शारीरिक रोग और मानसिक रोगों का कारण पाप कर्म मान कर लोग ध्यान साधना में लग रहे हैं।

योगी भी अवसाद से पीडित हैं। जिसे कह देते हैं पिछले जन्मों का हिसाब किताब है। कुछ हद तक यह ठीक है। हमारा शरीर एक अनोखी मशीनरी है। इस से काम लेने के लिये हमें अनेकों विटामिन तथा मिनरल की जरूरत होती है। जीवन में संघर्ष करते करते कुछ खास तत्वों की कमी हो जाती है जिस से हम निराश होने लगते हैं। यही निराशा अवसाद का रुप ले लेती है। इस अवसाद को दूर करने के लिये सूक्ष्म तत्व हमें सिर्फ भोजन से मिलते हैं। व्यक्ति जो भी भोजन खाता है उसका प्रभाव मनोदशा पर पड़ता है। जो हम खाते हैं वही बन जाते हैं। हम पौष्टिक आहार लेते हैं तो स्वस्थ और सुखी बन जायेंगे। असंतुलित आहार लेते हैं तो बीमारियों के शिकार बन जाते हैं। हमारे दिमाग को विभिन्न प्रकार के मिनरल व विटामिन्स की मदद जरूरत होती है। जब ये सभी संतुलित नहीं होते हैं तो हमें कोई न कोई रोग हो जाता है। उन रोगों का इलाज प्रकृतिक पदार्थ हैं। सारे विटामिन्स योग से नहीं मिलते। सम्पूर्ण भोजन का ध्यान रखें तो मानसिक अवसाद से बच सकते हैं। शतावरी की जड़ में अवसाद को रोकने और मनोदशा सुधारने की शक्ति होती है। मस्तिष्क तथा तंत्रिकाओ के लिये बहुत ही बढ़िया टानिक है। इस पौधे की जड़ को सुखा कर बनाये गये चूर्ण को दिन में एक बार लेने से मानसिक अवसाद दूर होता है। सेब मानसिक अवसाद से बाहर आने में करता है। इस फल को शहद और दूध के साथ लेने से ये टोनिक का काम करता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**महिला :** सर, खूप पाऊस पडतोय, अजून कुणी आलेलं नाही ऑफिसमध्ये, ट्रेन खूप उशिरा धावताहेत, असं सगळे जण सांगताहेत

**बॉस :** मग, तुम्ही कशा लवकर पोहोचल्या?

**महिला :** सकाळी सासू म्हणाली, लेट जाणार असशील तर आजचे जेवण तूच बनव, मग काय मी लगेच निघाले.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाला नोकरीमध्ये व शिक्षणामध्ये किती टक्के आरक्षण देण्यात आले आहे? - १०%

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

सहसा पाठांतर करून केलेला रोजचा अभ्यास हा डाव्या बाजूच्या मेंदूकडून केला जातो. परंतु नवनवीन कल्पना, कविता, चित्रकला यांसारख्या गोष्टी उजव्या बाजूच्या मेंदूत उगम पावतात.

वेगवेगळ्या कल्पना सुचण्यासाठी उजव्या मेंदूला सदैव कार्यशील करावे लागते. मुलांची कल्पनाशक्ती जागृत राहण्यासाठी त्यांच्या मनात आलेली कल्पना, चित्र त्यांना कागदावर उतरवून काढण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यांच्या मतांचा आदर करून ती व्यक्ती करण्यासाठी कायम प्रेरणा द्यावी. अशाप्रकारे अनेक प्रयोगांद्वारे आपण मुलांचा बौद्धिक विकास साधू शकतो. त्याचबरोबर आयर्वेदामध्ये बुद्धी व स्मृतिवर्धक अनेक औषधी सांगितलेल्या आहेत. शंखपुष्पी, ब्राह्मी, जटामसी, वेखंड, सुवर्णभस्म यापासून विविध कल्प बनवून बाळाला देता येतात. एक वर्षापुढील बाळाचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहून बुद्धी वाढण्यासाठी 'दाक्षर बालप्राश' अर्धा-अर्धा चमचा सुरु करावे. त्याचबरोबर पंचकर्मातील स्नेहन, शिरोधारा, नस्य हे उपक्रमही बाळाची बुद्धी वाढण्यासाठी उपयोगी आहेत. फक्त त्याकरिता तज्ज्ञ वैद्याचा सल्ला घेऊन औषधोपचार सुरु करावा.

### बौद्धिक विकास कसा करावा?

चार वर्षाच्या सार्थकला केबिनमध्ये आल्या आल्याच त्याची आई धपाटा घालत म्हणाली, ''हे बघा ना डॉक्टर, आमच्या अख्ख्या घराण्यात आतापर्यंत कोणी शिव्या दिलेल्या नाहीत, पण या मूर्ख पोराने आमची पार इज्जत घालवली. कोठून शिव्या शिकून येतो हा देवच जाणे.''

सार्थकच्या आईने तीन-चार वाक्यांतच दोन शिव्या दिल्या होत्या, पण रागाच्या भरात तिच्या ते लक्षात येत नव्हते. शास्त्रीय सिद्धांतानुसार मुले ही जन्मतःच अनुकरणप्रिय असतात. त्यांना कितीही चांगले वागण्यास सांगितले, तरीही ते पालकांचेच अनुकरण करतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगरमध्ये २० जुलैला पत्रकारांसाठी जिल्हास्तरीय मीडिया संमेलनाचे आयोजन

नगर – मीडिया प्रभाग, राजयोग शिक्षण आणि शोध प्रतिष्ठान, माऊंट आबू आणि प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, अहिल्यानगर शाखेच्या वतीने पत्रकारिता व माध्यम क्षेत्रात कार्यरत असलेल्या पत्रकारांसाठी २० जुलै रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत जिल्हास्तरीय मीडिया संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय शिवदर्शन भवन, ६३/४० महावीरनगर, सावेडी रोड, अहिल्यानगर येथे हे संमेलन होणार आहे.

समाजाचे दर्पण म्हणून माध्यमांकडे पाहिले जाते. स्वातंत्र्यपूर्व पत्रकारिता आणि स्वातंत्र्योत्तर पत्रकारिते मध्ये अनेक बदल होत आहे, अनेक प्रवाह आणि नवीन आयाम पत्रकारितेमध्ये आणि माध्यमांमध्ये आले आहेत. पेन पत्रकारितेपासून पेनलेस पत्रकारितेपर्यंत पोहचलेल्या या बदलत्या प्रवाहात पत्रकारितेतील शाश्वत मूल्य कुठे तरी लोप पावत असल्याची जाणीव होत आहे. या मूल्यांना पुनर्स्थापित करण्याची गरज निर्माण झालेली आहे. यासाठी पत्रकारितेतील बदलते प्रवाह आणि मूल्यांची पूर्नस्थापना आणि पेन ते पेनलेस (डिजिटल) पत्रकारितेचा प्रवास या विषयावर मार्गदर्शन केले जाणार आहे.

या संमेलनासाठी ब्रह्माकुमार डॉ. शांतनू भाईजी, राष्ट्रीय समन्वयक, मीडिया प्रभाग, माऊंटआबू (राजस्थान) आणि प्रा. डॉ. सोमनाथ वडनेरे, जळगाव, मीडिया प्राध्यापक व महाराष्ट्र राज्य मीडिया प्रभाग समन्वयक, मार्गदर्शन करणार.

संमेलनासाठी वृत्तपत्रे आणि प्रिंट मीडिया, टि.व्ही., रेडिओ, केबल आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया, मोबाईल जर्नालिझम, सायबर/सोशल मीडिया, तसेच पत्रकारिता आणि मीडिया शिक्षण देणाऱ्या संस्था, जनसंपर्क, जाहिरात आदि क्षेत्रातील मीडिया प्रतिनिधी, संपादक यांची कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सहभागासाठी कुठलेही नोंदणी शुल्क नाही, तथापि, नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी क्यूआर कोड अथवा: https://tinyurl.com/BkMahaMedia या लिंकद्वारे होऊ शकतें. उपरोक्त दोन्हीला पर्याय म्हणून ९८५०६९३७०५ या व्हॉटसप क्रमांकावर संपर्क साधू शकतात. संमेलनासंदर्भात अधिक माहितीसाठी https://bkmahamedia.com/ahilyanagar/ या वेबसाईट ला भेट द्यावी.

संमेलनानंतर सर्व पत्रकार बांधवांसाठी ब्रह्माभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात पत्रकारांनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या संचालिका ब्रह्माकुमारी राजेश्वरी दिदी यांनी केले आहे.

या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी ब्रह्माकुमारी राजेश्वरी दिदी यांच्या मार्गदर्शनाखाली बी के सुप्रभा दीदी, बी के डॉ. दीपक हरके यांच्यासह अहिल्यानगर सेवाकेंद्राचे सर्व बी के सदस्य प्रयत्नशील आहेत.

अधिक माहितीसाठी संपर्क करावा ब्रह्माकुमारी राजेश्वरी दिदी, संचालिका, अहिल्यानगर सेवा केंद्र. संपर्क सूत्र : ७२७६४३०२१३

# आध्यात्मिक विचारांतूनच आपले जीवन सार्थकी लागू शकते

### सचिन जगताप यांचे प्रतिपादन; माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ


माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे उद्घाटन आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते झाले.

नगर – महाराष्ट्र ही संतांची भुमी आहे, संतांनी मनुष्याचे जीवन सत्कारणी लावण्यासाठी दिलेले विचार लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. संत सावता महाराजांनी आपल्या कार्यातून समाजोद्धाराचे महान कार्य केले आहे. आध्यात्मिक विचारांचा वारसा समाजामध्ये तयार झाला पाहिजे, यातूनच आपले जीवन सार्थकी लागू शकते. आजच्या युवा पिढीने संत सावता महाराज यांचे विचार आत्मसात केले पाहिजे. उत्सव समितीच्यावतीने गेल्या अनेक वर्षांपासून माळीवाडा येथे या सप्ताहाचे आयोजन करत आहे. या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांची सेवा उपलब्ध होत असल्याने चांगले धार्मिक वातावरण निर्माण होत आहे. सप्ताहांतर्गत होत असलेले विविध सामाजिक उपक्रमातून समाजाला दिशा मिळत असल्याने असे धार्मिक कार्यक्रम नियमित होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी केले.

माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे उद्घाटन आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज, हभप विश्वनाथ आण्णा राऊत, उत्सव समितीचे प्रमुख छबुनाना जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, डॉ.संभाजी मिस्किन, पंडितराव खरपुडे, बाळासाहेब बोराटे, अविनाश घुले, दत्ता जाधव, माणिकराव विधाते, मंगलताई लोखंडे, सुवर्णा जाधव, सोमनाथ गाडळकर, वाहतुक शाखेचे पोलिस निरिक्षक बोरसे, संजय गवळी, बजरंग भुतारे, परेश लोखंडे, गणेश नन्नवरे, विष्णु फुलसौंदर, डॉ.अमोल जाधव, हभप बाळकृष्ण महाराज खेसे, सुरेश आंबेकर, हभप प्रभाताई भोंग, बापुसाहेब शिंदे, दत्ता गाडळकर, कैलास खरपुडे, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, नितीन शेरकर, रमेश बनकर, हर्षल म्हस्के, अमोल धाडगे, अशोक जाधव, विकास पटवेकर, विष्णूपंत म्हस्के, शकिल शेख, अनिल चेडे, अशोकराव कापरे, सुनिल पडोळे, भाऊसाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अशोकराव कानडे आदि उपस्थित होते.

उत्सव समितीप्रमुख छबूनाना जाधव म्हणाले, श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करुन समाजात धार्मिकता वाढावी. त्यातून समाजाची उन्नत्ती व्हावी. उत्सव समितीचे कार्यकर्त तन–मन–धनाने यात सहभागी होत असल्याने सप्ताह यशस्वी होतो. २४ जुलैपर्यंत चालणाऱ्या सप्ताहांतर्गत विविध किर्तनकारांची किर्तने होणार आहेत तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

याप्रसंगी भगवान फुलसौंदर, दत्ता जाधव, अविनाश घुले, बाळकृष्ण महाराज खेसे आदिंनी या सप्ताहाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उत्सव समितीचे कौतुक केले. अभिजित खोसे, मंगलताई लेंडकर, उज्वला शेरकर, शैलजा मुळे, अभिषेक खंदारे, केशव मोकाटे, सागर जाधव, रमेश बनकर, कमलेश खरपुडे, समर्थ पुंड, मोहित चौधरी, विशाल उदावंत, अक्षय आंबेकर, अक्षय म्हस्के, तनय बोरुडे, उदय पटवेकर, संतोष मेहेत्रे, निखिल डागवाले, संतोष मोकाटे, वैभव आंबेकर, गौरव डागवाले, ऋषिकेश राऊत, मोहित ढवळे, रवि रांधवने, प्रविण कानडे, गोरख कानडे, गणेश राऊत, अनिल फुलसौंदर आदिंसह उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

सूत्रसंचालन अभिषेक घटमाळ यांनी केले. कैलास खरपुडे यांनी आभार मानले. प्रारंभी कलश पुजन, प्रतिमा पुजन, ग्रंथपुजन, विणा पुजन, तुलसी पुजन आदिंचे विधीवत पुजन करण्यात आले. सप्ताह यशस्वीतेसाठी उत्सव समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# भक्ती ही आचरणातून घडणारी जीवनपद्धती

### हभप रायकर महाराज यांचे प्रतिपादन

नगर – आपल्या मनगटात श्रमाचे बळ आणि ओठात नामस्मरण असेल तर कोणतीही अडचण ही वाटचाल रोखू शकत नाही. भक्ती म्हणजे केवळ रितसर पूजा नव्हे, तर ती आचरणातून घडणारी जीवनपद्धती असल्याचे कीर्तनकार ह.भ.प. भागवताचार्य श्रीकृष्ण महाराज रायकर यांनी कीर्तनात अधोरेखित केले. कीर्तनात रायकर महाराजांनी साईबाबांच्या जीवनातील श्रद्धा, सबुरी, सेवा आणि त्याग यांचे महत्त्व विशद केले.



वसंतटेकडी येथील संदेशनगर मधील द्वारकामाई साई मंदिराचा १२ वा वर्धापन दिनी हभप भागवताचार्य रायकर महाराज यांचे कीर्तन झाले. (छाया – विजय मते)

### वसंत टेकडी येथील साई मंदिराचा १२वा वर्धापन दिन साजरा

वसंत टेकडी येथील संदेशनगरमधील द्वारकामाई श्री साई मंदिराचा १२वा वर्धापन दिन गुरुवारी उत्साह व भक्तिभावात साजरा झाला. पहाटे साईबाबांच्या मूर्तीला अभिषेक व महापूजनाने प्रारंभ झाला. दुपारी होम–हवन आणि संध्याकाळी महाआरतीचे आयोजन करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.

तसेच, कीर्तनाच्या दुसऱ्या भागात त्यांनी समाजातील वाढत्या ताणतणाव, नैराश्य आणि स्पर्धात्मक जीवनात साईबाबांचे तत्त्वज्ञान किती आवश्यक आहे हे उदाहरणांसह स्पष्ट केले. साईबाबा सांगतात की, जे घडते ते चांगल्यासाठीच, म्हणून प्रत्येक प्रसंगात संयम आणि श्रद्धा ठेवली पाहिजे, असे मार्गदर्शन त्यांनी केले. भाविकांनी टाळ्यांच्या गजरात या कीर्तनाचा आनंद घेतला.

या किर्तन सोहळ्यास हभप रवींद्र महाराज आव्हाड यांचे सहकार्य लाभले. नगरसेवक सुनील त्र्यंबके यांनी द्वारकामाई साई मंदिर व साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून वर्षभरात राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

याप्रसंगी बबलू सूर्यवंशी, पप्पू कापडे, सचिन ठोकळ, अमित गाढे, सचिन खोमणे, महेश टाक, दादा पाटोळे, निलेश पालवे, अमर मेट्टू, सुरज ठोकळ, आकाश त्र्यंबके, निखिल त्र्यंबके आदी कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# राज्य जलतरण स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी ८० खेळाडूंचा जिल्ह्याच्या संघात समावेश

### पुणे येथील बालेवाडीत रंगणार निवड चाचणी


राज्य जलतरण स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी ८० खेळाडूंचा जिल्ह्याच्या संघात समावेश करण्यात आला आहे.

नगर – राज्य जलतरण स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघाची निवड चाचणीसाठी जिल्ह्यातील ८० खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुल येथे १९ ते २१ जुलै दरम्यान होणाऱ्या ज्युनिअर गटाच्या राज्य जलतरण स्पर्धेत सदर खेळाडू उतरणार आहे.

लोणी येथे नुकतेच झालेल्या स्पर्धेतून जिल्हा संघाची निवड संघटनेचे सचिव रावसाहेब बाबर यांनी जाहीर केली आहे. या संघासाठी मार्गदर्शक म्हणून सर्वेश देशमुख, व्यवस्थापक म्हणून अकिल शेख व योगिता तनपुरे हे काम पाहणार आहेत. तर राष्ट्रीय खेळाडू अमरितसिंग राजपूत हा संघाचे नेतृत्व करणार आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंसाठी कराळे क्लब हाऊसचे संचालक करण कराळे यांनी खेळाडूंना टी–शर्ट दिले आहेत.

निवड चाचणीसाठी जाणाऱ्या खेळाडूंचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष विश्वजीत चव्हाण व अभिजीत चव्हाण यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.



श्री रामकृष्णमध्ये गुरुपौर्णिमा व हाऊस पदग्रहण समारंभ उत्साहात उत्साहात झाला.

# श्री रामकृष्णमध्ये गुरुपौर्णिमा व हाऊस पदग्रहण समारंभ उत्साहात

नगर – गुरू प्रति असणारा आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आषाढ पौर्णिमा हा दिवस गुरुपौर्णिमा म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांचे हाऊस दिले जातात व प्रत्येकावर जबाबदारी दिली जाते. संस्थेचे सचिव व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉक्टर शरद कोलते व संस्थेचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

यावेळी इयत्ता सातवी मधील विद्यार्थिनींनी गुरुप्रती असणारा आदर आपल्या नृत्यातून सादर केला व कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांना विद्यालयात आल्यानंतर आपली जबाबदारी शिस्त यांचे पालन करता यावे यासाठी प्रत्येक हाऊस मधून सीनियर व ज्युनियर कॅप्टन यांची निवड केली जाते तसेच शिक्षकांना सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हाऊस दिले जातात. ही निवड करत असताना मतदान पद्धतीने विद्यार्थ्यांच्या संगनमताने नि :पक्षपातीपणाने ही निवडणूक घेतली जाते व त्यामधून विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांना कॅप्टन बनविले जाते. यावर्षी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून इयत्ता नववी मधील कुमार ईशान जाजू, व विद्यार्थिनी प्रतिनिधी कुमारी कार्तिकी काळे यांची निवड करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रतिज्ञा देण्यात आली की मला दिलेले काम मी व्यवस्थित रित्या पूर्ण करून माझ्या कामाशी मी प्रामाणिक राहील. विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेची माहिती सांगून त्या दिनाचे महत्त्वही सांगण्यात आले. संस्थेचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर शरद कोलते यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना यांनी केला तर संस्थेचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांचा सत्कार संस्थेचे सहसचिव बजरंग दरक यांनी केला.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष व शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष नंदकुमार झंवर, संस्थेचे विश्वस्त रवींद्र गुजराथी, विद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. गगन वाधवा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संपदा देशपांडे, विद्यालयाच्या समन्वयक सौ. सुषमा उजागरे, पूर्व प्राथमिक व प्राथमिक वर्गाचे समन्वयक श्रेयकुमार गुंडू उपस्थित होते. विद्यालयाच्या प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

# एकल महिलांचा २० जुलैला पुनर्विवाह राज्यस्तरीय वधु वर परिचय मेळावा

### साऊ एकल महिला समिती व जगदंब फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम

नगर – साऊ एकल महिला समिती व जगदंब फाउंडेशन संचलित मराठी सोयरीक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने एकल महिला व पुरुषांसाठी मोफत राज्यस्तरीय वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मराठी सोयरीक संस्थेचा ९९ वा मेळावा मोफत असून हा २० जुलै ला संध्याकाळी ७ वाजता ऑनलाईन पद्धतीने गुगल मीट वर होणार असल्याची माहिती समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी, जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे व मराठी सोयरिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक कुटे यांनी दिली आहे.

पुनर्विवाह करू इच्छिणाऱ्या एकल महिला, पुरुष व लग्न जमतच नसलेले अविवाहित मुलांनी या मेळाव्यात भाग घेण्यासाठी ८४५३९०२२२२ या संस्थेच्या क्रमांकावर १९ जुलै पर्यंत मोफत नाव नोंदणी करणे गरजेचे आहे. फक्त नाव नोंदणी करणार्या सदस्यांनाच मेळाव्याच्या दिवशी गुगल मीटची लिंक पाठवण्यात येईल. त्यानंतर त्या लिंकने त्यांना जॉईन होता येणार आहे. राज्यभरातील पुनर्विवाहाचे अनेक चांगले पुरुष महिलांची स्थळे सर्वांना बघायला मिळणार आहेत. वधू वर परिचय मेळाव्यात त्यांनी स्वतः चा परिचय करून द्यावयाचा आहे. सर्वात महत्त्वाचे जे पुरुष एकल महिलांच्या मुलांचा लग्नासाठी स्वीकार करण्यासाठी तयार आहेत, अशाच पुरुषांनी मेळाव्यात नाव नोंदणी करावी. जे पुरुष मुलांचा स्वीकार करायला तयार नाहीत, त्यांना मेळाव्यात भाग घेता येणार नाही ही अट आहे. तसेच दोन्ही संस्थेच्या वतीने लग्न करू इच्छिणाऱ्या एकल महिला व पुरुषांसाठी पुनर्विवाह नाव नोंदणी अभियान कायमस्वरूपी चालू आहे ते कधीही वरील नंबर वर संपर्क करून नाव नोंदणी करून घेऊ शकतात. नाव नोंदणी केल्यानंतर त्यांना पुनर्विवाहाच्या व्हॉट्सअप ग्रुपला ॲड केले जाते. त्यात अनेक योग्य ती स्थळे त्यांना पाहायला मिळतात. या पद्धतीने आत्तापर्यंत संस्थेच्या माध्यमातून राज्यभरात ५३ एकल महिलांच्या पुनर्विवाहाचे लग्न लावण्यात आलेली आहेत. या सर्व लग्नांमध्ये महिलांच्या मुलांचा पुरुषांनी स्वीकार केलेला आहे. साऊ एकल महिला समिती गेल्या ६ वर्षापासून एकल महिलांसाठी भरीव असे सामाजिक कार्य करत आहे.

इच्छुकांनी ८८४७७२४६८० क्रमांकावर १९ जुलै पर्यंत नाव नोंदणी करावी असे आवाहन साऊ एकल महिला समितीचे राज्यभरातील समन्वयक संजय भोंधे नागपूर, नूतन मेघाडे जालना, सचिन ठाकरे बुलढाणा, डॉ. सूर्यप्रकाश गभने गडचिरोली, शबाना शेख सांगली, वैदेही सावंत रत्नागिरी, कविता बोंबले पुणे, कल्पना मोहिते संभाजीनगर, जीवन राठोड माजलगाव, नूतन माळवी वर्धा, विजय जाधव धाराशिव, गजानन सूरवसे परभणी यांनी केली आहे.


न्यायधार व महिला वकिलांच्या वतीने ॲड. विजया काकडे व ॲड.जयाताई पाटोळे यांचा सन्मान करण्यात आला.

# न्यायधार व महिला वकिलांच्या वतीने ॲड. विजया काकडे व ॲड.जयाताई पाटोळे यांचा सन्मान

नगर – न्यायधार व महिला वकिलांच्या वतीने अंबिका महिला बँकेच्या उपाध्यक्षपदी ॲड. विजया काकडे व बार असोसिएशनच्या महिला सचिव ॲड. जयाताई पाटोळे यांचा सन्मान करण्यात आला. जिल्हा न्यायालयात महिला बार रुममध्ये झालेल्या सन्मान सोहळ्याप्रसंगी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे पाटील, सचिव ॲड. संदीप बुरके, न्यायाधार संस्थेच्या अध्यक्षा ॲड. निर्मला चौधरी, ॲड.स्वप्नाली काकडे, ॲड. सुमेध चौधरी, ॲड. अजित रोकडे, ॲड. निरुपमा काकडे, ॲड. गुलशन धारानी, ॲड. प्रज्ञा उजागरे, ॲड. वृषाली तांदळे, ॲड. भक्ती शिरसाठ, ॲड. आशा गोंधळे, ॲड. रिजवाना खान, ॲड. मीना भालेकर, ॲड. दीक्षा बनसोडे, ॲड. शुभांगी चौधरी, ॲड.पूजा दुग्गड आदींसह महिला वकील उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. अनिता दिघे यांनी केले. करुणा शिंदे यांनी आभार मानले.

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे समाजाच्या उन्नतीसाठी मोठे योगदान

### राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्र गंधे



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाच्या अकोला शाखेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ब्राम्हण समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात बोलताना संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्र गंधे

नगर – देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या माध्यमातून देशात समाज उन्नतीचे कार्य सुरु आहे. ब्राम्हण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच समाजातील गरजू नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या समस्या, प्रश्न सोडवत त्यांना आर्थिक सहकार्य, शिष्यवृत्ती देणे यासह वैद्यकीय मदत, अशा अनेक योजना व उपक्रम राबवून मोठे योगदान देत आहे. समाजातील खऱ्या गरजवंताच्या मागे मंडळ कायम उभे आहे. ब्राम्हण समाजातील विद्यार्थी पूर्ण जगात आपल्या बुध्मात्तेचा डंका वाजवत आहेत. अशा गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन संस्था करत आहे. अनेक दानशुरांचे मदतीचे हात संस्थेच्या मागे आहेत, असे प्रतिपादन देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्र गंधे यांनी केले.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाच्या अकोला शाखेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ब्राम्हण समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्र गंधे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान करत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष पी.पी. कुलकर्णी, अकोल संघाचे अध्यक्ष श्री. महाशब्दे, श्री. देघूळकर, श्री. देशमुख आदी विश्वस्त मंडळाचे पदाधिकाऱ्यांसह समाजातील नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.

# रोजगार मेळाव्यात ९० उमेदवारांची प्राथमिक निवड

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योकता मागदर्शन केंद्र, मॉडल करिअर सेंटर व मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज ग्रीकल्चर, अहिल्यानगर यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पंडित दिनदयाल उपाध्यय रोजगार मेळाव्यामध्ये ९० उमेदवारांची प्राथमिक तर ३० उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली असल्याची माहिती कौशल्य विकास विभागाचे प्र. सहायक आयुक्त रविकुमार पंत यांनी दिली आहे.

यावेळी जिल्हा व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी सुनिल शिंदे, स्नाईडर इलेक्ट्रिक इंडिया लि. चे श्रीकांत गाडे, एक्साईड इंडस्ट्रीजचे राधेश शिंदे, क्लासिक व्हील्स लि. च्या अपूर्वा गोसावी, शुभदा पाठक आदी उपस्थित होते.

रोजगार मेळाव्यामध्ये ६ आस्थापनांनी ३२७ पदे अधिसूचित केली होती. नामांकित कंपन्यांकरिता मुलाखली घेण्यात येऊन शासनाच्या विविध रोजगार व स्वयंरोजगार योजनांची माहिती उपस्थित उमेदवारांना देण्यात आली. रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणाची संधीही एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्यात आली होती. रोजगार मेळाव्यास १९९ उमेदवारांनी उपस्थित राहून प्रत्यक्ष मुलाखती दिल्या. या उपक्रमामध्ये निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्राचे वितरण करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# विद्यार्थ्यांना पुस्तकांमधील ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कामाचा अनुभव इंटर्नशिपमुळे मिळतो

**महेश कुंभार यांचे प्रतिपादन; छत्रपती अभियांत्रिकी मध्ये 'इंटर्नशिप अ‍ॅण्ड ऑन जॉब ट्रेनिंग' कार्यशाळा**

नगर – विद्यार्थ्यांना पुस्तकांमधील ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या क्षेत्राशी संबंधित व्यावहारिक ज्ञान आणि अनुभव मिळतो, तसेच करिअरच्या संधींची माहिती मिळते ते शिकलेल्या गोष्टींचा उपयोग कसा करायचा हे त्यांना समजते, अशा सर्व गोष्टी कार्यक्रमा प्रमुख पाहुणे एल अ‍ॅण्ड टी अहिल्यानगर येथील महेश कुंभार यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंटर्नशिप अ‍ॅण्ड ऑन जॉब ट्रेनिंग' या विषयावर महाविद्यालयाच्या सावित्रीबाई फुले सेमिनार हॉल या ठिकाणी कार्यशाळा झाली.

इंटर्नशिपमुळे संवाद कौशल्य, समस्या सोडवण्याची क्षमता, टीमवर्क आणि इतर आवश्यक कौशल्ये विकसित होतात, याविषयी आम इंडिया सुपा येथील एच आर प्रमुख प्रवीण भालेराव यांनी बोलत असताना आपले मत मांडले.



छत्रपती अभियांत्रिकीमध्ये 'इंटर्नशिप अ‍ॅण्ड ऑन जॉब ट्रेनिंग' कार्यशाळेमध्ये माहिती देताना महेश कुंभार.

इंटर्नशिपमुळे भविष्यात चांगली नोकरी मिळवण्याची शक्यता वाढते, कारण नियोक्ता तुमच्या कामाच्या अनुभवाकडे लक्ष देतात, असे मत अविनाश कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना इंटर्नशिपमुळे तुमच्या कामावर आणि तुमच्या क्षमतेवर तुमचा विश्वास वाढतो, ज्यामुळे तुम्ही अधिक आत्मविश्वासू बनता आणि इंटर्नशिप तुम्हाला भविष्यातील नोकरीसाठी तयार करते.

या कार्यशाळेसाठी एक्साइड इंडस्ट्रीज, शोरत इंडस्ट्रीज, कायनेटिक व्हॅट्स अ‍ॅण्ड व्होल्ट्स लिमिटेड यांसारख्या विविध कंपनीचे एच. आर.देखील उपस्थित होते.

दुपारच्या सत्रामध्ये महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या विविध विभागांमधील विभागप्रमुख व त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या कंपनीचे एच. आर. यांच्यामध्ये चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या माध्यमातून भविष्यात विद्यार्थ्यांना नवनवीन संधी कशा उपलब्ध करून देता येतील याविषयी चर्चा झाली. या कार्यक्रमासाठी प्रा. पी. जी. निकम (सिव्हील विभागप्रमुख), डॉ. एम. के. भोसले (प्रथम वर्ष समन्वयक), प्रा. एस. एम. वाळके (ई अ‍ॅण्ड टी सी विभाग प्रमुख), प्रा. ए. बी. काळे (मेकॅनिकल विभागप्रमुख), प्रा. एस. पी. विधाते (कम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख), डॉ. व्ही. व्ही. पाटील (ए.आय. विभागप्रमुख) हे सर्व उपस्थित होते. प्रा. ए. आर. माने यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. अक्षय देखणे यांनी केले. प्रा. एस. एम. वाळके यांनी आभार मानले.

# सिंधी समाजाचे पुणे (पिंपरी), इंदौर व नागपूर येथे वर-वधू परिचय संमेलन

नगर – सिंधी प्रोग्रेस मेटरीमोनियम ऑर्गनायझेशन पिंपरी, पुणेतर्फे आयोजित ३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ से संध्याकाळी ४ वाजे पर्यंत बी. टी. अडवानी हॉल, पिंपरी पुणे येथे होणार आहे.

माहितीसाठी जवाहर कोटवाणी ९८२२५६२००५, श्रीचंद नागराणी ९८२२३२६८१८, कुमार मोटवानी ९८२३०१६४२५, टेहेल चुगानी ९८२३६६८८७८, किशोर कंत्रोड (अहिल्यानगर) ८९९९८१२४०८ यांच्याशी संपर्क करणे.

सुजाग सिंधी मंच इंदौर तर्फे घटस्पोटीत, विकलांग, विधवा, विदुर भारताच्या बाहेरील वर–वधु साठी पुस्तीकाचे प्रकाशन व परिचय संमेलनाचे ९ नोव्हेंबर रोजी आयोजन केले जाणार आहे. रजिस्ट्रेशन करून घेणे अधिक माहितीसाठी प्रकाश मदनानी ८९८९६२५९२०, किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८/९२२६७८३१०१ यांच्याशी संपर्क करणे

नागपूर सिंधी सोशल फार्म पूज्य समाज आश्रम तर्फे पोस्ट ग्रजुएट वर वधु परिचय संमेलनाचे आयोजन १४ डिसेंबर रोजी केले जाणार आहे. अधिक माहितीसाठी मोहन मंजानी ७८८७५६५१४७, प्रकाश चेतवाणी ७५८८७६३०८१, दिलीप सावलानी ९३७३४५४८००, किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८/९२२६७८३१०१ यांच्याशी संपर्क करणे

अधिक माहिती साठी बडते कदम रायपुर नंदलाल मुलतानी ९१३१३४०६१० / ९४२५५०२५७०, सोलापूर मीना नागदेव ८६६८५०९०३०, नांदेड चंद्रप्रकाश लालवाणी ९४२२१७४७५१, उल्लासनगर विनोद भारानी ९८२२०६५७४४, न्यु मुंबई सुभाष राय गोगिया झुलेलाल मंदिर ९८२११३०५९०, बीड डॉ. मदनलाला जेसवानी ९८९०४६०७००, ठाणे संतराम माखिजा ९८१९५१०७४४, नाशिक प्यारा परिवार शाम मोटवानी ९८२२०६१६१२, महेश नागपाल ९८२२०९४९६०, पुणे वर्षा मोहनानी ९०४९४६४१५१, हैद्राबाद मॅरेज ब्युरो हॉल अशोक वासवानी ९८४९४७७९७४, जळगाव बाबा हरदासराम मॅरेजब्युरो नरेश मंगलानी ९३७१२१२४००, संजय हिरानी ९४२२७८३०५६, शारदा तलरेजा बँगलोर ९८८६७२२७२२, सुरत नयन विश्नानी ८३२०४०४७१३, अहिल्यानगर किशोर कंत्रोड ८९९९८१२४०८/९२२६७८३१०१, मधुर मिलन मेरेज ब्युरो, (सोशल सर्व्हिस) किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदरा कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जवाहर कोटवाणी, कुमार मोटवाणी, किशोर कंत्रोड, मोहन मंजानी, प्रकाश मादनानी, महेश मध्यान, दिलीप सावलानी.

# सिंधी समाजाचा 'चालिहो' उत्सवास प्रारंभ



नगर – सिंधी बांधवांच्या चाळीस दिवसाचा उपवासाचा पर्व (१६ जुलै ते २४ ऑगस्ट) अर्थात चालिहो साहिबची उत्साहात, श्रद्धाभावाने सुरुवात झाली. सिंधी कॉलनी, तारकपूर येथील श्री झुलेलाल मंदिर येथे चालिहो व्रत आरंभ निमित्त आयोजित कार्यक्रमात बहराणो साहेबची पूजा, आरती, अखो, पल्लव तसेच भजन म्हणत उत्सवाचा प्रारंभ उत्साहात करण्यात आला. याप्रसंगी सिंधी जनरल पंचायत ट्रस्टचे पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य, श्री झुलेलाल मंदिर समिती सदस्य, महिला व पुरुष भाविक उपस्थित होते. याप्रसंगी भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले.

याशिवाय सावेडी येथील सतनाम साक्षी गोशाळेत तसेच गुलमोहर रोड वरील माता लालवारी झुलेलाल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांनी चालिहो उत्सवास प्रारंभ करण्यात आला. चालिहो नावाच्या या धार्मिक सण उत्सवाला सिंधी समाजात आगळे वेगळे असे महत्त्व आहे. चालिहो सणाचा संबंध जलदेवतेशी आहे. सिंधी समाजात वरूण देवतेची पूजा प्राचीन काळापासून केली जाते. चालिहो हा वरूण देवता झुलेलाल यांच्या पूजेशी संबंधित असून भगवान झुलेलाल हे सिंधी समाजाचे इष्ट देव आहे. चालिहो यांचा अर्थ चाळीस दिवसाचा उपवास, व्रत, पूजा इत्यादी, झुलेलालचे भक्त चाळीस दिवसाचा उपवास करतात या काळात काही नियम पाळीत वरूण देवतेची पूजा व स्तुती करण्यात येते. मंदिरात जाऊन सामूहिक प्रार्थनेद्वारे समस्त मानव जातीच्या कल्याणाची भावना व्यक्त करीत वरूण देवतेकडे सगळीकडे चांगला पाऊस पडू दे व सुजलाम, सुफलाम होऊ दे अशी प्रार्थना केली जाते.

सिंधी कॉलनी येथील श्री झुलेलाल मंदिरात पुढील चाळीस दिवस दररोज सायंकाळी बहराणो साहिबची पूजा, आरती, पल्लव नंतर भाविकांना प्रसाद वाटप करण्यात येणार असून याशिवाय झुलेलाल चालीसा पाठ व भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन ठिकठिकाणी 'चालिहो' उत्सव काळात करण्यात येणार असून भाविकांनी लाभ घ्यावा असे अवाहन सिंधी जनरल पंचायत तर्फे करण्यात आले.

# कौशल्य प्रशिक्षणातून युवतींना आपला व्यवसाय उभा करता येणार

**कविता तडके यांचे प्रतिपादन; जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त ब्युटी पार्लर प्रशिक्षणाचे उद्घाटन**

नगर – समाजात सक्षमपणे उभे राहण्यासाठी युवतींनी देखील उद्योग-व्यवसायात उतरण्याची गरज आहे. कौशल्य प्रशिक्षण घेऊन युवतींना आपला व्यवसाय उभा करता येणार आहे. युवतींसाठी ब्युटी पार्लर क्षेत्रात मोठी संधी असून, व्यावसायिक प्रशिक्षणातून महिला सक्षमीकरणाचा पाया रोवला जात आहे. महिला सक्षमीकरणाच्या या चळवळीत योगदान देताना अभिमान वाटत असल्याचे कविता तडके यांनी स्पष्ट केले.

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त शहरातील महिलांसाठी सरकारमान्य ब्युटी पार्लर प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले. कौशल्य विकास व उद्योजक मंत्रालय संचलित जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून डावरे गल्ली येथे के.टी. ब्युटी पार्लर अ‍ॅण्ड अकॅडमीच्या वतीने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षण शिबिराला महिलांसह युवतींचा प्रतिसाद लाभला. जन शिक्षण संस्थेचे संचालक बाळासाहेब पवार यांच्या हस्ते या ब्युटी पार्लर प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी शफाकत सय्यद, प्रशिक्षिका कविता तडके आदींसह प्रशिक्षणार्थी महिला व युवती उपस्थित होत्या.



जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त शहरातील महिलांसाठी सरकारमान्य ब्युटी पार्लर प्रशिक्षणाचे उद्घाटन करताना जन शिक्षण संस्थेचे संचालक बाळासाहेब पवार आदी.

बाळासाहेब पवार म्हणाले की, विविध कौशल्य आत्मसात करुन महिलांनी समाजात उभे रहावे. कौशल्य प्रशिक्षण व्यवसाय उभारणीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अनेक महिला व युवतींनी जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन स्वत:चा विकास साधला आहे. भारत हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. युवक-युवतींमध्ये कौशल्य विकसीत झाल्यास देशाच्या विकासाला गती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तर जन शिक्षण संस्थेत ५८ वर्षापासून प्रशिक्षणाची योजना सुरू झालेली असून, भारतभर २८९ जन शिक्षण संस्था काम करत आहेत. मागील वर्षांमध्ये ५ लाख युवक-युवतींना वेगवेगळे व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वत:चा व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. व्यवसाय उभारण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्रामोद्योग केंद्र व प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत या प्रशिक्षणार्थींना कर्ज उपलब्ध करुन दिले जात असल्याची माहिती पवार यांनी दिली.

शफाकत सय्यद यांनी महिला आर्थिक सक्षम झाल्यास ते कुटुंबासह आपली प्रगती झपाट्याने साधू शकतात. महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून, उद्योग, व्यवसायात देखील महिला पुढे येत असल्याचे सांगून महिलांना प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रशिक्षणात प्रत्येकी २० महिलांचे बॅच करण्यात आलेल्या आहेत. तीन महिने यामध्ये महिला व युवतींना ब्युटी पार्लर अ‍ॅण्ड हेअर कटचे अद्यावत प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिला-युवतींना या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



मंगल भक्त सेवा मंडळाकडून सनफार्मा विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

# मंगल भक्त सेवा मंडळाकडून सनफार्मा विद्यालयात शालेय साहित्य वाटप

नगर – सन फार्मा माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालय, एम.आय.डी.सी. नागापूर, ता. जि. अहिल्यानगर येथे १४ जुलै रोजी इ. ५ वी ते १० वी पर्यंतच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) अहिल्यानगरच्या वतीने शालेय साहित्य स्वरूपात वह्या व दप्तर इत्यादिचे वाटप मंडळाचे सेवेकरी चंद्रकांत कोठारी, बंडूनाना सप्रे, योगेश कंठाळे, राजू आगरकर व संतोष व्यवहारे यांचे हस्ते मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वेश्वर स्वामी महाराज राजाभाऊ कोठारी यांच्या वतीने एक सामाजिक दायित्व या भावनेतून करण्यात आले.

याप्रसंगी मंडळाचे ज्येष्ठ सेवेकरी संतोष व्यवहारे यांनी आपल्या मंडळाच्या वतीने चालू असलेल्या उपक्रमाबाबत माहिती व त्याचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते व सर्व सेवकवृंद उपस्थित होते.

विद्यालयाच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष गुरूवर्य भाऊंचा सन्मान प्रातिनिधिक स्वरूपात बंडूनाना सप्रे यांनी स्विकारला. शिक्षक रविंद्र गावडे यांचे सहकार्य लाभले. चंद्रकांत कोठारी यांनी विद्यालयाचे आभार मानले.

# बालक मंदिर महिला मंडळ शाळेत गुरु पौर्णिमा कार्यक्रम

नगर – बालक मंदिर महिला मंडळ शाळेत १४ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव झाला. महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा सौ. ज्योती केसकर या अध्यक्षस्थानी होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी श्रीमती शैलजा ताडपत्रीकर होत्या. या कार्यक्रमासाठी निमंत्रीत पाहुण्या पाडकवी शाळेच्या माजी मुख्याध्यापिका असलेल्या सुशीला मोडक, सौ. विद्या भालेराव, श्रीमती उषा घुमरे या गुरुस्थानी होत्या. तसेच महिला मंडळ संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. विद्या होळेहोन्नूर, सदस्या श्रीमती पुष्पा चितांबर, सदस्या सौ. रोहिणी पुंडलिक यावेळी उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांचे श्लोक पाठांतराचे सादरीकरण झाले. गीत व नृत्यातून गुरुवंदना विद्यार्थिनींती सादर केली. तसेच विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व दप्तर वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी केले.



बालक मंदिर महिला मंडळ शाळेत गुरु पौर्णिमा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती निरुपमा देशपांडे यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. मनीषा कुलकर्णी यांनी केले. श्रीमती मेंद्रे, सौ.सातपुते, सौ.पवार, सौ. कवाष्टे, सौ. ओहोळ, सौ. बोलली याशिक्षक वृंदांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.



भिंगारच्या भगवान गौतमबुध्द जॉगींग पार्कमध्ये राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण अभियानाप्रसंगी उद्योजक नितीन शिंगवी.

# निरोगी आरोग्य व पर्यावरण संवर्धन चळवळीला भिंगार येथील 'हरदिन मॉर्निंग ग्रुप'ने गती दिली

**नितीन शिंगवी यांचे प्रतिपादन; भिंगारच्या भगवान गौतमबुध्द जॉगींग पार्कमध्ये वृक्षारोपण**

नगर – ज्याचे स्वास्थ्य चांगले, तो सर्वसंपन्न व्यक्ती होय. जीवन निरोगी असल्यास जीवनाचा आनंद घेता येतो. हरदिन मॉर्निंग ग्रुपने निरोगी आरोग्य व पर्यावरण संवर्धन चळवळीला गती देण्याचे काम केले. ग्रुपच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी सुरु असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक तथा उद्योजक नितीन शिंगवी यांनी केले.

भिंगारच्या भगवान गौतमबुध्द जॉगींग पार्कमध्ये राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण अभियानाप्रसंगी उद्योजक शिंगवी बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सीए किरण भंडारी, नरेंद्र बाफना, सचिन कटारिया, मनोज रांका, हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, जहीर सय्यद, शशिकांत घिगे, रमेश वराडे, दिलीप ठोकळ, सर्वेश सपकाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, सुधीर कपाळे, दिलीप गुगळे, अशोक पराते, शिरीष पोटे, दीपक बडदे, सुभाष पेंढुरकर, अभिजीत सपकाळ, संजय भिंगारदिवे, अविनाश जाधव, अविनाश पोतदार, विठ्ठलनाना राहींज, दीपक अमृत, विशाल भामरे, मुन्ना वाघस्कर, शेषराव पालवे, किरण फुलारी, राजू कांबळे, कोंडीराम वाघस्कर, दिनेश शहापूरकर, कुमार धतुरे, सूर्यकांत कटोरे, सुहास देवराईकर, सुदाम गांधले, विकास निमसे, रामनाथ गर्जे, योगेश चौधरी, प्रमोद सोळंकी, प्रज्योत सागू, नामदेवराव जावळे आदींसह हरदिनचे सदस्य उपस्थित होते.

उपस्थित पाहुण्यांना ग्रुपची स्मरणिका भेट देऊन सत्कार करण्यात आला.

# भाषांचे अनोखे एकत्रीकरण सारडा महाविद्यालयात

**संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचा महोत्सव रंगला**

नगर – सध्या राज्यात भाषांवरून राजकारण पेटलेले असताना पेमराज सारडा महाविद्यालयात संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचे अनोखे एकत्रीकरण करत भाषा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील ११ वी व १२ वी मधील विद्यार्थी उत्साहात या महोत्सवात सहभागी होत चारही भाषांच्या विविध पैलूंची ओळख करून घेतली. यानिमित्ताने सभागृहात चारही भाषांच्या भित्तीपत्रकांचे छोटेसे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरवातीला सर्व भाषा कशा एक आहेत हा संदेश देणारी लघुनाटिकाही विद्यार्थ्यांनिंनी सादर केली. तसेच वृत्तपत्र, रेडीओ या माध्यमांच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांनी सजलेला हा भाषा महोत्सव शेवटपर्यंत रंगतच गेला.



सारडा महाविद्यालायात आयोजित भाषा महोत्सवाचे उद्घाटन करताना निवेदिका वीणा दिघे. समवेत पत्रकार भूषण देशमुख, प्रा.शिरीष मोडक, अजित बोरा, डॉ.पारस कोठारी, प्रा.ज्योती कुलकर्णी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे, पर्यावेक्षक प्रा.महेश कुलकर्णी, सुजित कुमावत, राजू रीक्कल, प्रबंधक अशोक असेरी आदींसह प्राध्यापक.

भाषा महोत्सवाचे उद्घाटन निवेदिका वीणा दिघे व पत्रकार भूषण देशमुख यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास संस्थेचे मार्गदर्शक अजित बोरा, महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे, पर्यावेक्षक सुजित कुमावत, प्रबंधक अशोक असेरी आदींसह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, सारडा महाविद्यालयातील भाषा महोत्सवाचा उपक्रम खूप वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. या उपक्रमाने विद्यार्थ्यांना चारही भाषांचे अधिक ज्ञान मिळाले आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक उत्तमप्रकारे ज्ञानदान करून भाषांची चांगली सेवा करत आहेत.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, कितीही उच्च शिक्षण घेतले तरी भाषांचे घेतलेले ज्ञान कधीही वाया जात नाही. भाषांवरील प्रभुत्वामुळे आपल्या व्यक्तिमत्वाचा वेगळेपणा निर्माण होतो. यासाठी विद्यार्थ्यांनी भाषांकडे दुर्लक्ष न करता सखोल ज्ञान घ्यावे.

प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणल्या, आमच्या महाविद्यालयीन काळात अशाप्रकारचे उपक्रम होत नसे. सारडा महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी कायम नवनवीन उपक्रम राबवले जात असल्याने येथील विद्यार्थी भाग्यवान आहेत.

प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील असे वेगवेगळे नाविन्यपूर्ण उपक्रम सतत राबवले जात आहेत. संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या चारही भाषा महत्वाच्याच आहेत. यांचे उत्तम ज्ञान मिळण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन केले.

यावेळी वीणा दिघे यांनी आकाशवाणीवरील निवेदन, मुलाखत बाबत मार्गदर्शन केले तर भूषण देशमुख यांनी वृत्तपत्रातील बातमी लेखन, अग्रलेख बाबत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात पर्यावेक्षक प्रा.महेश कुलकर्णी यांनी महोत्सवा मागची संकल्पना व्यक्त केली. प्रा.अर्चना कुलकर्णी यांनी आभार मानले, प्रा.गोपीनाथ होले व चंद्रकला जाधव यांनी परिचय दिला. भाषा महोत्सवाचे आयोजन प्रा.अतुल कुलकर्णी, संस्कृत विभागाच्या भावना वैकर, मराठी विभागाच्या प्रा. डॉ. स्मिता भुसे, प्रा. डॉ. राजु रीक्कल, हिंदी विभागाचे बाबा गोसावी, प्रा.वैशाली सामल, प्रा ज्योती वाकडे, इंग्रजी विभागाचे प्रा.प्रसाद बेडेकर आदींनी केले.

# अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनतर्फे २० जुलै रोजी जिल्हास्तरीय महारक्तदान शिबीर

नगर – अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय महा रक्तदान शिबिराचे आयोजन २० जुलै रोजी सकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

हे शिबिर ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन सेक्रेटरी कै. भावेशभाई सोलंकी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात येत आहे. यंदा या उपक्रमाचे चौथे वर्ष असून, याला संग्रामभैय्या जगताप सोशल फाउंडेशन, I Love नगर, आणि ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन यांचे सहकार्य लाभले आहे. जिल्ह्यातील १० प्रमुख रक्तपेढ्यांची पथके पूर्ण तयारीसह संकलनासाठी सज्ज आहेत.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले, रक्तदान ही काळाची गरज आहे. एक पिशवी रक्त एखाद्या रुग्णासाठी आयुष्य देऊ शकते. २०२४ मध्ये विक्रमी रक्तसंकलन करणाऱ्या या उपक्रमाचा यंदाचा उद्देश अधिक व्यापक आहे. यंदा फक्त अहिल्यानगरपुरते मर्यादित न राहता, तालुका पातळीवरही तब्बल १२ तालुक्यांमध्ये महा रक्तदान शिबिरांचे आयोजन AMRA च्या माध्यमातून करण्यात आले आहे, ही खरोखरच गौरवाची बाब आहे.

नरेंद्र फिरोदिया यांनी सांगितले, अन्नदान श्रेष्ठ, पण रक्तदान सर्वश्रेष्ठ! हे केवळ दान नसून माणुसकीचा खरा अर्थ आहे. समाजासाठी आणि गरजूंकरता आपण सगळ्यांनी मिळून हे पवित्र कार्य हाती घेतले पाहिजे.

या उपक्रमाच्या आयोजनासाठी कोअर कमिटी सदस्य अमित बुरा, रितेश सोनीमंडलेचा, साजीद खान, प्रितम तोडकर, राकेश सोनीमंडलेचा, हिरा खुबचंदानी, मनोज बरलोटा, संतोष बलदोटा, गोरख पडोळे, मनिष चोपडा आणि अतुल रचा आदी सदस्यांनी मेहनत घेतली आहे.

हा उपक्रम केवळ रक्तदान नाही, तर माणुसकीला जोडणारा एक सशक्त दुवा आहे. त्यामुळे नागरिकांनी सहभागी होऊन या ऐतिहासिक शिबिराचा भाग व्हावा, असे आवाहन AIMRA महाराष्ट्राचे अध्यक्ष अजित जगताप आणि AMRA अहिल्यानगरचे अध्यक्ष अजित पवार यांनी केले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्याचे २७ जुलैला अनावरण

**मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची घोषणा**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्यासंबंधी महापालिकेमध्ये पुतळा कृती समिती व आंबेडकरी समाज बांधव एकत्रित बैठक झाली.

नगर – मार्केटयार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या संदर्भात अनेक दिवसांपासून शहरात अनावरणाची चर्चा सुरू होती. या अनुषंगाने पुतळा कृती समिती व आंबेडकरी समाजाच्या वतीने अहिल्यानगर महापालिकेमध्ये समाज बांधव एकत्रित येऊन बैठक घेण्यात आली. या बैठकीत मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी घोषणा केली की २७ जुलैला संध्याकाळी ५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचा ऐतिहासिक अनावरण सोहळा आमदार संग्राम जगताप व पुतळा कृती समितीच्या माध्यमातून होणार असून या ऐतिहासिक सोहळ्यामध्ये सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

या बैठकीमध्ये सर्व समाज बांधवांनी आपापले विविध मत व्यक्त करून एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला. २७ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्राच्या विधिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरांचा ठराव झाला होता. त्याच दिवसाचे औचित्य साधून येणाऱ्या २७ जुलैला ऐतिहासिक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार असल्याचे सांगितले.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार व आंबेडकरी चळवळी मधील सर्व नेते यांनाही आमंत्रित केले. १९ जुलै रोजी पत्रकार परिषद घेऊन कार्यक्रमाची सर्व रूपरेषा जाहीर करणार आहे.

# विनापरवाना भंगार साहित्य वाहतूक करणारा मालट्रक पकडला; नगर-दौंड रोडवर पोलिसांची कारवाई, ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – विनापरवाना भंगार साहित्य वाहतूक करणारा मालट्रक नगर दौंड रोडवरील अरणगाव चौक येथे नगर तालुका पोलिसांनी पकडला आहे. ही कारवाई १६ जुलै रोजी रात्री साडेबारा वाजल्याचा सुमारास केली.

नगर तालुका पोलीस अरणगाव परिसरात रात्र गस्त घालत असताना अरणगाव चौक येथे एक मालट्रक (क्र. एम एच ४२ बी एफ ८७४१) रस्त्याच्या कडेला उभा असलेला दिसला. पोलिसांनी ट्रक चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अनिकेत दत्तू साबळे (वय २७, रा. आंध्रुनी, ता. इंदापूर जि. पुणे) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी ट्रकमध्ये काय आहे असे विचारले असता त्याने ट्रकमध्ये लोखंडी पत्रे व लोखंडी भंगारचे साहित्य असल्याचे सांगितले. पोलिसांनी भंगार मालाच्या मालकी हक्काबाबत, कागदपत्राची विचारणा केली असता त्याने भंगारच्या मालाबाबत कुठल्याही प्रकारचा मालकी हक्क असल्याचे कागदपत्रे अगर पुरावा दिला नाही. यावरुन तो विनापरवाना भंगार साहित्याची वाहतूक करत असल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी त्याच्याकडून ५ लाख रुपये किमतीचा मालट्रक व आतील ३ लाख रुपये किमतीचे भंगार साहित्य असा ८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पो. कॉ. अशोक भताने यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ट्रकचालक अनिकेत साबळे याच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२४ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली. पुढील तपास सहाय्यक फौजदार शेळके हे करीत आहेत.

# ‘आपले सरकार’ केंद्रांच्या सेवांवर अभिप्रायासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात कक्ष सुरु



‘आपले सरकार’ केंद्रांच्या सेवांवर अभिप्रायासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात कक्ष सुरु करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आदी.

नगर – महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या अधिसूचित सेवांबाबत नागरिकांचा अभिप्राय घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे ‘अभिप्राय कक्ष’ कार्यान्वित करण्यात आला आहे.

नागरिकांना विहित शुल्क आकारून व ठराविक मुदतीत सेवा पुरविण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या ‘आपले सरकार’ सेवा केंद्रांमधून सेवा सुलभपणे मिळतात का? विहित शुल्कापेक्षा जास्त रक्कम आकारली जाते का ? सेवा मुदतीत मिळतात का ? तसेच केंद्र चालकांकडून नागरिकांना चांगली वागणूक दिली जाते का ? या बाबींवर नागरिकांचा थेट अभिप्राय घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिप्राय कक्ष स्थापन करण्याचे निर्देश दिले होते.

या अनुषंगाने १ जुलै पासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाचव्या मजल्यावर अभिप्राय कक्ष कार्यान्वित झाला आहे. सदर कक्षात १० ग्राहक सेवा प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले असून ते ०२४१-२३१००६१ या दूरध्वनी क्रमांकावर नागरिकांशी संपर्क साधून अभिप्रायाची नोंद घेत आहेत.

सद्यःस्थितीत महसूल विभागाच्या अधिसूचित सेवांबाबत अभिप्राय नोंदविण्याचे काम सुरू असून लवकरच जिल्हा निबंधक व मुद्रांक विभाग, महानगरपालिका व भू-अभिलेख विभागाच्या सेवांचा समावेशही करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, ‘आपले सरकार’ सेवा केंद्रामार्फत घेतलेल्या सेवा संदर्भात तक्रार अथवा सूचना असल्यास अधिकृत अभिप्राय कक्षास ०२४१-२३१००६१ या क्रमांकावर कळवाव्यात किंवा देण्यात आलेला क्यूआर कोड स्कॅन करून अभिप्राय नोंदवावा, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाचे तहसीलदार शरद घोरपडे यांनी केले आहे.

# पीक स्पर्धेत अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवावा : जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

नगर – खरीप व रब्बी हंगामासाठी सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीकस्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या पीक स्पर्धेमध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येऊन उत्पादकतेमध्ये वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पाकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. त्यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात भर पडेल, या उद्देशाने राज्यांतर्गत या पीकस्पर्धा राबविण्यात येत आहेत.

सर्वसाधारण व आदिवासी गटसाठी तालुकास्तरावरील पीकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरुन राज्य, जिल्हा व तालुकास्तरावरील स्पर्धेसाठी शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. या स्पर्धे अंतर्गत खरीप पीकासाठी ११ व रब्बी हंगामातील ५ अशा एकूण १६ पिकांसाठी स्पर्धा घेतली जाणार असून तालुका, जिल्हा व राज्य या तीन स्तरावर स्पर्धकांची निवड होणार आहे.

खरीप पिकामध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मुग, उडिद, सोयाबीन, भुईमूग, सूर्यफुल तर रब्बी पिकांमध्ये ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस या ५ पिकांचा समावेश आहे. खरीप हंगामातील मुग व उडीद पिकांसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै आहे. भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भूईमुग, सूर्यफुल पिकांसाठी ३१ ऑगस्ट तर रब्बी हंगामातील ज्वारी, गहु, हरभरा, करडई, जवस पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५ अशी आहे.

तालुका पातळीवर पहिले बक्षीस ५ हजार रुपये, दुसरे ३ हजार तर तृतीय बक्षीस २ हजार रुपये एवढे आहे. जिल्हा पातळीवर पहिले बक्षीस १० हजार रुपये, दुसरे ७ हजार तर तृतीय बक्षीस ५ हजार रुपये एवढे आहे. राज्य पातळीवर पहिले बक्षीस ५० हजार रुपये, दुसरे ४० हजार तर तृतीय बक्षीस ३० हजार रुपये एवढे आहे.

# यशवंत डांगे आयुक्त आहेत की भ्रष्टाचाऱ्यांचे प्रवक्ते?

**विकासकामांमधील भ्रष्टाचार दडवण्यासाठी त्यांची हिंदुत्वाच्या नावाने बनवाबनवी : किरण काळे**



नगर – मनपातील ७७६ रस्त्यांच्या कामात झालेल्या महाघोटाळ्याच्या बाबतीत आयुक्त यशवंत डांगे यांनी केलेला खुलासा पाहता ते मनपाचे आयुक्त आहेत की भ्रष्टाचाऱ्यांचे प्रवक्ते ? तुमच्या हाती आयुक्त म्हणून आम्ही शहर सोपवलय. मात्र तुम्ही भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालण्यामध्ये व्यग्र आहात. आपल्या कार्यालयात काय चाललंय हे जर आयुक्तांना माहीत नसेल तर ठाकरे शिवसेना त्यांचा अभ्यास वर्ग घेण्यासाठी कागदपत्रांसह सज्ज आहे, असा टोला लगावत शहर प्रमुख किरण काळे यांनी, आयुक्तांनी मनपाच्या प्रांगणात असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर यावं. मी त्यांची शिकवणी घेऊन ते ज्या भ्रष्टाचाऱ्यांना वाचवत आहेत ते त्यांना पुराव्यानिशी दाखवून द्यायला तयार आहे, असे जाहीर आवाहन केले आहे. विकास कामांमधील भ्रष्टाचार दडवण्यासाठी त्यांची हिंदुत्वाच्या नावाने बनवाबनवी सुरू आहे. भगवा टिळा, भगवी टोपी, भगवा पंचा घालून शहराचे लोकप्रतिनिधी भगवद्गीतेत नैतिकतेने वागण्याच्या दिलेल्या उपदेशाच्या विरुद्ध वागत आहेत. हा भगव्याचा, हिंदुत्वाचा अपमान असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे.

खा. संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहिल्यानगरमधील स्कॅमबद्दल पत्र लिहून पुराव्यांची फाईल पाठवत गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती. त्यानंतर मनपा आयुक्त डांगे यांनी तात्काळ प्रसारमाध्यमांशी संवाद साधत खुलासे केले होते.

काळे म्हणाले, स्वतः आमदारांनी सांगितले आहे की निधी त्यांनी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे या कामाशी त्यांचा थेट संबंध असल्याची कबुलीच त्यांनी दिली आहे. सर्व ठेकेदार हे त्यांचेच कार्यकर्ते आहेत. जनतेच्या तिजोरीतील निधी हे मंत्रालयातून आणतात. मनपात जनता कर भरून कोट्यावधी रुपये जमा करते. यातून गरजेपेक्षा खूप अधिक वाढीव रकमांचे इस्टिमेट राजकीय दबावातून अधिकाऱ्यांशी संगणमत करून तयार करून घेतले जातात. आमदार, मनपा अधिकारी, ठेकेदार यांची नार्को टेस्ट करा अशी मागणी काळे यांनी केली.

डांगेंनी भ्रष्टाचाऱ्यांची, आमदारांची प्रवक्तेगिरी सुरू केली आहे. शहराची कामे करण्यापेक्षा कलेक्शन एजंट असणाऱ्या राजकीय हस्तक, ठेकेदार यांच्याबरोबर अँटी चेंबरमध्येच त्यांचा सगळा वेळ जातो. मी ८ मे २०२३ ला पहिले पत्र याबाबत मनपा आयुक्त यांना दिले होते. त्यानंतर १५ मे, २२ मे, २३ ऑगस्ट २०२३, १४ जुलै २०२५ अशी एक नाही तर अनेक पत्र दिली आहेत. मला मनपाने २५ मे, २६ मे, २९ मे, ३१ मे २०२३ अशी एक नाहीतर अनेक वेळेला कधी अतिरिक्त मनपा आयुक्त, तर कधी उपायुक्त यांच्या समितीची नेमणूक चौकशीसाठी नेमणूक केल्याचं लेखी कळवलं आहे. मी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनासमोर या घोटाळ्यात गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी आत्मदहन करण्याचा इशारा २०२३ मध्ये दिला होता. त्यावर मला आत्मदहनाच्या आदल्या दिवशी पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलीस स्टेशनमध्ये मला ३१ मे २०२३ ला आयुक्तांच्या मान्यतेने उपयुक्त, शहर अभियंता मनोज पारखे, अभियंता निंबाळकर यांनी दीड महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण करून दोषींवरती गुन्हे दाखल करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. एवढं सगळं सुरू असताना आयुक्त म्हणतात की अशी कोणती ही तक्रारच आलेली नाही. घोटाळा झालेला नाही. आयुक्त म्हणतात शासकीय तंत्रनिकेतनचे टेस्ट रिपोर्ट बनावट असल्याबाबत मनपाकडे कोणती ही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. तक्रार नाही. ३० जून २०२३ रोजी अर्धशासकीय पत्र शासकीय तंत्रनिकेतनने आयुक्तांना पाठवत पाच सदस्यांच्या समितीने चौकशी अंतिम ७७६ कामांमध्ये शासकीय तंत्रनिकेतनच्या नावाने बनावट टेस्ट रिपोर्ट जोडले असून पोलीस विभागाने सांगितल्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याकरिता मनपाच्या ताब्यात असणाऱ्या गुन्ह्याच्या मूळ प्रति यांची मागणी केली होती. एवढेच नाही तर शासकीय निकेतनने आयुक्तांना १९ मे, २९ मे, २८ जून २०२३ ला याबाबत वेळोवेळी पत्र व्यवहार केला आहे. २२ जून २०२३ ला स्मरणपत्र देखील दिल आहे.

## आयुक्तांनी राजीनामा तरी द्यावा, नाहीतर बदली तरी करून घ्यावी

आयुक्त डांगे हे आयुक्त नव्हे तर राजकीय कार्यकर्त्याप्रमाणे वागत आहेत. राजकारण करायची एवढीच हौस असेल तर त्यांनी कार्यक्षम, भ्रष्ट नसणाऱ्या, प्रामाणिक अधिकाऱ्यासाठी आमच्या महापालिकेच्या आयुक्त पदाची खुर्ची खाली करावी. राजीनामा द्यावा. सरकारमध्ये सहभागी असणाऱ्या राष्ट्रवादीचे घड्याळ हातात बांधत पक्ष प्रवेश करून या शहरातून मनपाची निवडणूक लढवावी. मात्र नगरकरांना कुणाच्याही रिमोट कंट्रोलवर चालत वेठीस धरू नये अन्यथा त्यांनी बदली करून घ्यावी, असा सल्ला काळे यांनी दिला आहे.

## मनपा प्रशासन, सत्ताधाऱ्यांनी शहराची वाट लावली

शहरामध्ये सर्वत्र कचऱ्यांचा खच, चौकाचौकात नागरि वस्त्यांमध्ये, बाजारपेठेमध्ये साचला आहे. ऐन पावसाळ्यात नियोजन शून्य कारभारातून बाजारपेठेच्या शहराचा बहुतांशी भाग खोदून ठेवला आहे. नळाला मैला मिश्रित पाणी येत आहे. दोन दिवस, तीन-चार, कधी कधी एक आठवड्याने पाणी येत आहे. मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला आहे. आजपर्यंत एवढी दुरावस्था या शहराची यापूर्वीच्या कोणत्याच आयुक्तांच्या काळात झाली नव्हती. विद्यमान आयुक्तांनी रिमोट कंट्रोलच्या नादात निष्क्रियतेचा विक्रम केला आहे, असे म्हणत काळे यांनी मनपाचे वाभाडे काढले असून ठाकरे शिवसेना नगरकरांच्या हक्कांसाठी आक्रमकपणे लढत राहील असे म्हटले आहे.

# महापालिकेत रस्त्याच्या कामात कोणताही आर्थिक घोटाळा नाही



यशवंत डांगे

नगर – महानगरपालिकेत सुमारे ७७६ रस्त्यांच्या कामात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याच्या बातम्या दाखवल्या जात आहेत. असा कोणताही घोटाळा महानगरपालिकेत झालेला नाही. अशी तक्रार माझ्यापर्यंत आलेली नाही. शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या नावाचा बनावट टेस्ट रिपोर्ट केल्याचा आरोप आहे, त्याबाबतही तक्रार पाहण्यात आलेली नाही. मात्र, बनावट टेस्ट रिपोर्ट म्हणजे त्याचा अर्थ काम झालेच नाही, असा होत नाही, असे सांगत रस्त्याच्या कामांमध्ये कोणताही घोटाळा, अपहार झालेला नसल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याच्या बातम्या सुरू आहेत. यात आमदार संग्राम जगताप यांच्या वरदहस्ताने तत्कालीन महापौर व पदाधिकाऱ्यांनी हा घोटाळा केल्याचे आरोप होत आहेत. याबाबत आता महानगरपालिकेने खुलासा केला आहे. काम न करता खोटे बिले काढल्याचा, असा कोणताही घोटाळा झालेला नाही. महानगरपालिका केलेल्या कामांची देयके अदा करण्यापूर्वी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाकडून टेस्ट रिपोर्ट करून घेते. ही प्रशासकीय प्रक्रिया आहे. महाविद्यालयाचे टेस्ट रिपोर्ट बनावट असल्याबाबत महापालिकेकडे अधिकृत माहिती उपलब्ध नाही. त्याची तक्रारही माझ्याकडे आलेली नाही. तक्रार आल्यास याबाबत पडताळणी केली जाईल. मात्र, रिपोर्ट बनावट असले तरी रस्त्याचे काम झालेले नाही, काम न करताच बिल अदा झाले, असा कोणताही घोटाळा झालेला नसल्याचे यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

आमदार संग्राम जगताप यांच्या महानगरपालिकेतील हस्तक्षेपाचा आरोपावरही यशवंत डांगे यांनी स्पष्टीकरण दिले आहेत. महापालिकेचे कामकाज हे महाराष्ट्र महापालिका कायद्यानुसार चालते. जनतेने जे लोकप्रतिनिधी निवडून दिलेले आहेत, त्यांनी नागरिकांच्या तक्रारी, मागण्या आदींबाबत केलेल्या त्यांच्या सूचना महापालिकेला विचारत घ्याव्या लागतात, असेही यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

# डीएमएलटीच्या परिक्षेत मुलींनी मारली बाजी



जयश्री यलमार



दिपाली गायकवाड



ऋतुजा उंडे

नगर – सिद्धी कौशल्य विकास संस्था अहिल्यानगर येथे महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई अंतर्गत डीएमएलटी व रेडिओलॉजी टेक्निशियन हे कोर्स चालविले जातात. डीएमएलटी या कोर्सचा एप्रिल २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे.

यामध्ये जयश्री यलमार हिने प्रथम क्रमांक, दिपाली गायकवाड हिने द्वितीय क्रमांक तर ऋतुजा उंडे हिने तृतीय क्रमांक पटकावला आहे.

डीएमएलटी हा कोर्स दोन वर्षाचा असून याद्वारे नोकरी व व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे मत आरती संकलेचा यांनी मांडले.

सदर विद्यार्थ्यांना सारिका घोडके, प्राजक्ता मनसुके आदींचे मार्गदर्शन लाभले.

# जनसुरक्षा कायद्याला राज्यपालांनी मंजुरी देऊ नये

**विधेयकविरोधी संघर्ष समितीची मागणी; राज्यपालांची घेतली भेट**



राज्य सरकारच्या जनसुरक्षा विधेयकला मंजुरी देऊ नये, या मागणीचे निवेदन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना देताना भाकपचे राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे, माकपचे आमदार कॉ. विनोद निकोले, भारत जोडो अभियानच्या उल्का महाजन, कॉ. प्रकाश रेड्डी, ॲड. राजू कोरडे, ब्रायन लोबो, कॉ. उदय भट आदी.

नगर – राज्य सरकारच्या जनसुरक्षा विधेयक (बिल क्रमांक ३३, २०२४) ला मंजुरी देऊ नये, अशी मागणी जनसुरक्षा विधेयकविरोधी संघर्ष समितीने १६ जुलै ला राज्यपालांकडे केली. विविध राजकीय पक्ष व लोकचळवळींच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत राजभवन येथे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी कायद्यातील विविध मुद्द्यांवर व जाचक तरतुदी बद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. या संघर्ष समितीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय-एम), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी-लेनिनवादी) लिबरेशन, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, भारत जोडो अभियान, श्रमिक मुक्ती दल यांच्यासह डावे प्रागतिक पक्ष व संघटनांचा समावेश आहे. सर्व पक्ष व संघटना संविधानाच्या चौकटीत राहून काम करत असून, या विधेयकामुळे लोकांच्या मूलभूत हक्कांवर गदा येणार असल्याचा इशारा या पक्ष-संघटनेच्या नेत्यांनी दिला आहे.

याबाबत राज्यापालांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे, की या विधेयकात वापरलेली अवैध कृती व अवैध संघटना यासारखी संज्ञा अत्यंत सैल व अस्पष्ट असून, त्याचा गैरवापर करून निष्पाप नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, संघटनांचे कार्यकर्ते यांच्यावर अन्यायकारक कारवाई होऊ शकते. जनसुरक्षा विधेयकासाठी सरकारच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे १२,७०० लोकांच्या प्रतिक्रिया सादर झालेल्या होत्या. ज्यापैकी ९,५०० लोकांनी विधेयक रद्द करण्याची मागणी केली होती. मात्र, लोकसुनावणी न घेता आणि केवळ तीन कलमांत किरकोळ बदल करून हे विधेयक विधानसभा व विधान परिषदेत पाशवी बहुमताच्या जोरावर घाईघाईने मंजूर करण्यात आले आहे. या कायद्याचा उपयोग शांततापूर्ण आंदोलन, सविनय कायदेभंग, मोर्चा, रास्ता रोको यांसारख्या लोकशाही मार्गांनी सरकारविरोधात आवाज उठवणाऱ्यांना दडपण्यासाठी होणार आहे, हा कायदा जनविरोधी, घटनाविरोधी असून या कायद्याचा सरकारकडून दुरुपयोगच होणार आहे, असा आरोप समितीने केला. राज्यपालांनी संविधानाच्या अनुच्छेद २०० नुसार हा कायदा मंजूर न करता, विधानसभेकडे परत पाठवावा आणि पुनर्विचार व्हावा, अशी मागणी समितीने यावेळी केली.

यावर राज्यपाल यांनी समितीचे आणखी काही मुद्दे लेखी स्वरूपात स्पष्ट करण्याची सुचना अधिकाऱ्यांना दिल्या व दिलेले निवेदन काळजीपूर्वक वाचून योग्य वाटतील त्या मुद्यांवर राज्य शासनाकडे स्पष्टीकरण मागितले जाईल असे त्यांनी समिती च्या शिष्टमंडळाला सांगितले आहे.

याप्रसंगी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे, राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. प्रकाश रेड्डी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आमदार कॉ. विनोद निकोले, भारत जोडो अभियानाच्या कार्यकर्त्या उल्का महाजन, भाकपा (माले)चे कॉ. उदय भट, शेकापचे ॲड. राजेंद्र कोर्डे, कष्टकरी संघटनेचे ब्रायन लोबो, कॉ. अशोक सुर्यवंशी, कॉ. चेतन माढा, कॉ. कुशल राउत उपस्थित होते.

